कर्नाटक सरकार

डी.एस.ई.आर.टी .बेंगळूरु

जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,- बेळगावी

# अध्ययन पुनर्प्राप्ती ( कलिका चेतरिके )

**2022-23**

7

**इयत्ता:-7 वी**

**मराठी प्रथम भाषा**

# शिक्षक हस्तपुस्तिका

समग्र शिक्षण कर्नाटक ,बेंगळूरु

आणि

राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण विभाग, बेंगळूरु

## ಸಂದೇಶ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಮಕ್ಕಳ ಶಿಕ್ಷಣವೇ ಭಾರತದ ಭವಿಷ್ಯ. ಇದಕ್ಕಾಗಿ ಕೇಂದ್ರ ಸರ್ಕಾರವು ಹೊಸ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿಯನ್ನು 2020ರಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಿದೆ. ಈ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ 2020 ರ ಶಿಫಾರಸ್ಸುಗಳನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಮುಂಚೂಣಿಯಲ್ಲಿದ್ದು, ವ್ಯವಸ್ಥೆಯಲ್ಲಿ ಸಾಕಷ್ಟು ಸುಧಾರಣೆಗಳನ್ನು ತರಲಾಗುತ್ತಿದೆ. ಪಠ್ಯಕ್ರಮ ವಿನ್ಯಾಸ, ಕಲಿಸುವಿಕೆಯಲ್ಲಿ ನಾವೀನ್ಯತೆ, ತರಗತಿ ಪ್ರಕ್ರಿಯೆಯ ಮರುವಿನ್ಯಾಸ ಹಾಗೂ ಶಾಲೆಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಸಮೃದ್ಧ ವಾತಾವರಣ ನಿರ್ಮಾಣ ಮಾಡಲು ಹಲವು ಕಾರ್ಯತಂತ್ರಗಳನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ. ಈಗಾಗಲೇ ನಿಪುಣ್ ಭಾರತ್ ಮಿಷನ್, ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾ ಜ್ಞಾನ ಕೌಶಲಗಳನ್ನು ಖಾತ್ರಿಪಡಿಸುವಲ್ಲಿ ಕಾರ್ಯಪ್ರವೃತ್ತಗೊಂಡಿದೆ.

ಪ್ರಸ್ತುತ ಕೋವಿಡ್-19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕ ರೋಗದಿಂದಾಗಿ ಮಕ್ಕಳು ಔಪಚಾರಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಪಡೆಯುವಲ್ಲಿ ಅಡೆತಡೆಗಳಾಗಿ, ಎರಡು ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವಾಗಿರುತ್ತದೆ. ಔಪಚಾರಿಕ ಹಾಗೂ ಅನೌಪಚಾರಿಕ ಕಾರ್ಯತಂತ್ರಗಳ ಮೂಲಕ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕೆಯ ನಿರಂತರತೆಗೆ ಪ್ರಯತ್ನಿಸಿದ್ದಾಗ್ಯೂ ಸಹ ನಿರೀಕ್ಷಿತ ಮಟ್ಟದ ಕಲಿಕೆ ಆಗದಿರುವುದನ್ನು ಹಲವು ಅಧ್ಯಯನಗಳು ತಿಳಿಸಿವೆ. ಈ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ನಾವೆಲ್ಲರೂ ಕಾರ್ಯಪ್ರವೃತ್ತರಾಗಬೇಕಿದೆ. ಸದರಿ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ವೈಜ್ಞಾನಿಕ ತಳಹದಿಯ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ **'ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ'** ಎಂಬ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು 2022-23ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸುತ್ತಿದೆ.

ಎಲ್ಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಿಂದಿನ ಎರಡು ತರಗತಿಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇ ಬೇಕಾಗಿದ್ದ ಪ್ರಮುಖ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳನ್ನು ಗುರುತಿಸಿದೆ. ಇದಕ್ಕೆ ಸಂವಾದಿಯಾಗಿ ಪ್ರಸಕ್ತ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಪ್ರಮುಖ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳನ್ನು ಜೋಡಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಯನ್ನು ಸಿದ್ಧಪಡಿಸಲಾಗಿದೆ. ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳು ಚಟುವಟಿಕೆಗಳಿಂದ ಕೂಡಿದ್ದು, ಮಗುವಿನ ಮುಗ್ಧ ಮನಸ್ಸಿಗೆ ಸಂತೋಷವನ್ನುಂಟು ಮಾಡುವಂತೆ ರೂಪಿಸಲಾಗಿರುತ್ತದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಪೂರ್ಣಗೊಳಿಸುವುದರಿಂದ ಹಾಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸಬಹುದು ಎಂಬ ಆಶಯ ನನ್ನದಾಗಿರುತ್ತದೆ. ಕಲಿಕಾ ಹಾಳೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಗಳು ಪರಸ್ಪರ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ಶಿಕ್ಷಕರು ತಮ್ಮ ಕೈಪಿಡಿಯಲ್ಲಿ ನೀಡಿದ ಮಾರ್ಗಸೂಚಿಯನ್ವಯ ಈ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯವನ್ನು ಅದರ ಅಂತಸ್ಸತ್ವದಿಂದ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಿ, ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆಯ ಸುಧಾರಣೆಗೆ ಕಾರಣವಾಗುತ್ತೀರಿ ಎಂದು ಹಾರೈಸುತ್ತೇನೆ. ಆದ್ದರಿಂದ ಇಲಾಖೆಯ ಸರ್ವರೂ, ಪೋಷಕವರ್ಗ ಮತ್ತು ಭಾಗೀದಾರರೆಲ್ಲರೂ ಇದರಲ್ಲಿ ಪರಿಣಾಮಕಾರಿಯಾಗಿ ಕೈ ಜೋಡಿಸಿ ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಯಶಸ್ವಿಗೊಳಿಸುತ್ತೀರೆಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ.

ಎಲ್ಲರಿಗೂ ಶುಭವಾಗಲಿ.............

**ಶ್ರೀ ಬಿ.ಸಿ.ನಾಗೇಶ್,**
**ಸನ್ಮಾನ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರು,**
**ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ, ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ**

## ಮುನ್ನುಡಿ



ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ –2020ರ ಆಶಯದಂತೆ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆ ಮತ್ತು ಅಭಿವೃದ್ಧಿ ನಮ್ಮೆಲ್ಲರ ಜವಾಬ್ದಾರಿ. ಆದರೆ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕ ವಿಪತ್ತಿನಿಂದ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ವ್ಯತ್ಯಯವಾಗಿ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಯನ್ನು ಕಾಪಾಡಿಕೊಳ್ಳಲು ಕಳೆದೆರಡು ವರ್ಷಗಳಿಂದ ಸಾಧ್ಯವಾಗಿರುವುದಿಲ್ಲ. ಸಾಕಷ್ಟು ಕಲಿಕಾ ಅಂತರವಾಗಿರುತ್ತದೆ. ಈ ಅಂತರವನ್ನು ನೀಗಿಸಲು 2022–23ನೇ ಸಾಲಿನಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಎಂಬ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ.

ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮದ ಮೂಲಕ ಎಲ್ಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ, ಸಂಖ್ಯಾ ಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಒತ್ತು ನೀಡಲಾಗುವುದು ಹಾಗೂ ಮಗು ತನ್ನ ಹಿಂದಿನ ತರಗತಿಗಳಲ್ಲಿ ಅತ್ಯಗತ್ಯವಾಗಿ ಗಳಿಸಲೇಬೇಕಿದ್ದ ಕಲಿಕಾ ಫಲಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಸಕ್ತ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇ ಬೇಕಾದ "ಅತಿ ಮುಖ್ಯ ಕಲಿಕಾ ಫಲ" ಗಳನ್ನು ಗುರುತಿಸಿ, ಚಟುವಟಿಕೆ ರೂಪಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಯನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗಿದೆ. ಇವುಗಳಲ್ಲಿ **'ನಿಪುಣ್ ಭಾರತ್', 'ವಿದ್ಯಾಪ್ರವೇಶ್'ನಂತಹ ಉಪಕ್ರಮಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತಗೊಳಿಸಲಾಗಿದೆ.** ಈ ಚಟುವಟಿಕೆಗಳು ಶಿಶುಕೇಂದ್ರಿತ, ಕಲಿಕಾ ಹಾಗೂ ಶಿಕ್ಷಕ ಸ್ನೇಹಿಯಾಗಿವೆ. ಚಟುವಟಿಕಾ ಹಾಳೆಗಳ ಜೊತೆಗೆ, ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ಅಗತ್ಯ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ನೀಡುವ 'ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿ'ಯನ್ನೂ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ನೀಡಲಾಗುತ್ತಿದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಬಳಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಸರಿದೂಗಿಸುವ ಕಾರ್ಯವನ್ನು ತಾವೆಲ್ಲರೂ ಜವಾಬ್ದಾರಿಯಿಂದ ನಿರ್ವಹಿಸುತ್ತೀರೆಂಬ ಆಶಯವನ್ನು ಹೊಂದಿರುತ್ತೇನೆ. ಈ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ ತಮಗೂ ಮತ್ತು ಅಜೀಂ ಪ್ರೇಮ್ ಜೀ ಫೌಂಡೇಶನ್ ಸಂಸ್ಥೆಗೂ ಇಲಾಖೆಯ ಪರವಾಗಿ ಅಭಿನಂದನೆಗಳು.

**ಡಾ. ಎಸ್. ಸೆಲ್ವಕುಮಾರ್ ಭಾ.ಆ.ಸೇ.**
**ಪ್ರಧಾನ ಕಾರ್ಯದರ್ಶಿಗಳು,**
**ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ**

## ಆಶಯ ನುಡಿ



ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಬದುಕಿನಲ್ಲಿ ಪ್ರತೀ ನಿತ್ಯವೂ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆ ಅತ್ಯಗತ್ಯ. ಆದರೆ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕದಿಂದಾಗಿ ಜಾಗತಿಕವಾಗಿ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಗೆ ವ್ಯತ್ಯಯ ಉಂಟಾಗಿ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವಾಗಿರುವುದು ವೇದ್ಯ. ಇದನ್ನು ಸರಿದೂಗಿಸುವುದು ನಮ್ಮ ಆದ್ಯ ಕರ್ತವ್ಯವಾಗಿದೆ. ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದಲ್ಲಿ ಕೋವಿಡ್–19 ನಿಂದಾಗಿ ಶಾಲೆಗಳು ಮುಚ್ಚಲ್ಪಟ್ಟಾಗ ವಿದ್ಯಾಗಮ, ಸಂವೇದ, ವಿಶೇಷ ಸೇತುಬಂಧ ಮುಂತಾದ ಪರ್ಯಾಯ ಕಾರ್ಯಕ್ರಮಗಳನ್ನು ರೂಪಿಸಿದರೂ ಮುಖಾಮುಖಿ ತರಗತಿ ಪ್ರಕ್ರಿಯೆಗೆ ಇವೆಲ್ಲಾ ಸಮಾಂತರವಾಗುವುದಿಲ್ಲ. ಪ್ರಸ್ತುತ **ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ** ಕಾರ್ಯಕ್ರಮವು ವೈಜ್ಞಾನಿಕ ತಳಹದಿಯ ಮೇಲೆ ಶಿಶು ಕೇಂದ್ರಿತ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ರೂಪಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ನೀಡುತ್ತಿರುವ ವಿನೂತನ ಪ್ರಯತ್ನ. ಸರಿಸುಮಾರು ಎರಡು ವರ್ಷಗಳ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಪ್ರಕ್ರಿಯೆಗಳು ಪೂರ್ಣವಾಗಿ ನಡೆಯದೇ, ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಉಂಟಾಗಿರುವ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸುವ ಸಲುವಾಗಿಯೇ ರೂಪಿಸಿದ ಉಪಕ್ರಮ. ಈ ಕಾರ್ಯವನ್ನು ಒಂದು ವರ್ಷದವರೆಗೆ ರಾಜ್ಯದಾದ್ಯಂತ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ತಾವೆಲ್ಲರೂ ತುಂಬಿಕೊಡುತ್ತೀರಿ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ. ಕಾರ್ಯಕ್ರಮದ ಪರಿಣಾಮಕಾರಿ ಅನುಷ್ಟಾನಕ್ಕಾಗಿ ಎಲ್ಲಾ ಭಾಗೀದಾರರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳುವಿರೆಂದು ನಂಬಿದ್ದೇನೆ.

**ಡಾ. ವಿಶಾಲ್ ಆರ್, ಭಾ.ಆ.ಸೇ.**
**ಆಯುಕ್ತರು,**
**ಸಾರ್ವಜನಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು**

## ಆರಂಭಿಕ ನುಡಿ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಹಿಂದಿನ ಎರಡು ವರ್ಷಗಳ ಕಾಲ ಕೋವಿಡ್–19ರ ಕಾರಣದಿಂದ ಔಪಚಾರಿಕ ತರಗತಿಗಳು ನಿರೀಕ್ಷೆಯಂತೆ ನಡೆಯದೇ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವುಂಟಾಗಿರುವುದು ಶೋಚನೀಯ. ಇದರಿಂದಾಗಿ ಕಲಿಕಾ ಅಂತರ, ಸಾಮಾಜಿಕ ಹಾಗೂ ಭಾವನಾತ್ಮಕ ಏರುಪೇರುಗಳೂ ಉಂಟಾಗಿವೆ. ಈ ಎಲ್ಲ ಅಡೆತಡೆಗಳನ್ನು ನಿವಾರಿಸಿ, ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಯನ್ನು ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲು 2022–23ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ **ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು** ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ. ಪ್ರತಿಯೊಬ್ಬ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯು ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನವನ್ನು ಸಾಧಿಸುವುದು ಪ್ರಥಮ ಆದ್ಯತೆಯಾಗಿರುತ್ತದೆ. ಎಲ್ಲಾ ಕಲಿಕೆಗೆ ಮೂಲಭೂತವಾಗಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನ ಅತ್ಯಗತ್ಯ. ಆದ್ದರಿಂದ ಆಯಾ ತರಗತಿಯ ನಿರ್ದಿಷ್ಟ ಕಲಿಕಾ ಫಲಗಳೊಂದಿಗೆ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನದ ಕಲಿಕಾ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತಗೊಳಿಸಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗಿದೆ. ತಾವು ಇಲ್ಲಿ ನೀಡಿರುವ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಬಳಸಿಕೊಂಡು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಕಲಿಕಾ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವಿರಿ ಹಾಗೂ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಪೂರೈಸುವಿರಿ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ. ಇದನ್ನು ಶಾಲಾಧಾರಿತವಾಗಿ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ಮಾಡುತ್ತಾ ನಿಗದಿತ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಮತ್ತು ಪರಿಕಲ್ಪನೆ ಗಳಿಕೆಗೆ ಪ್ರಾಮಾಣಿಕ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡುತ್ತೀರಿ ಎಂದು ನಂಬಿರುತ್ತೇನೆ. ತಮ್ಮೆಲ್ಲರ ಬೆಂಬಲದಿಂದ ಪರಿಣಾಮಕಾರಿ ಅನುಷ್ಠಾನ ಸಾಧ್ಯ. ಈ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಎಲ್ಲರಿಗೂ ಯಶಸ್ಸನ್ನು ಹಾರೈಸುತ್ತೇನೆ.

**ಶ್ರೀಮತಿ ಪಲ್ಲವಿ ಆಕುರಾತಿ, ಭಾ.ಆ.ಸೇ**
**ಮಾನ್ಯ ರಾಜ್ಯ ಯೋಜನಾ ನಿರ್ದೇಶಕರು,**
**ಸಮಗ್ರ ಶಿಕ್ಷಣ ಕರ್ನಾಟಕ, ಬೆಂಗಳೂರು**



## ಪ್ರಾಸ್ತಾವಿಕ ನುಡಿ

**ಆತ್ಮೀಯರೇ,**

ಹೊಸ ಶತಮಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಒಳಗೊಂಡ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ–2020ರ ಅನುಷ್ಠಾನ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿನ ಬದಲಾವಣೆಗೆ ನಾವೆಲ್ಲರೂ ತೆರೆದುಕೊಳ್ಳಬೇಕಿದೆ. ಅದರ ಜೊತೆಗೆ ಕೋವಿಡ್ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಉಂಟಾದ ವ್ಯತಿರಿಕ್ತ ಪರಿಣಾಮವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ಹೊಣೆಗಾರಿಕೆ ಮಹತ್ತ್ವದ್ದಾಗಿದೆ. ಕಳೆದ ಎರಡು ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಬಹು ಮಾಧ್ಯಮಗಳನ್ನು ಬಳಸಿಕೊಂಡು ವಿದ್ಯಾಗಮ, ಸಂವೇದದಂತಹ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಉಪಕ್ರಮಗಳ ಮೂಲಕ ಮಾಡಿದ ಪ್ರಯತ್ನಗಳ ನಡುವೆಯೂ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ಸಾಕಷ್ಟು ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಉಂಟಾಗಿರುವುದು ವಾಸ್ತವದ ಸಂಗತಿ. ಕಲಿಕಾ ನಷ್ಟ, ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಪೂರೈಸುವ ಯೋಜನೆಯೇ **'ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ'** ಕಾರ್ಯಕ್ರಮ. ಈ ಸಂದರ್ಭೋಚಿತ ಉಪಕ್ರಮದಲ್ಲಿ ಈ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನ ಸಾಮರ್ಥ್ಯವನ್ನು ಸಾಧಿಸುವುದರೊಂದಿಗೆ, ಹಿಂದಿನ ಎರಡು ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷಗಳ ಆಯ್ದ ಕಲಿಕಾಫಲಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಸಕ್ತ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಅತ್ಯಗತ್ಯ ಕಲಿಕಾಫಲಗಳನ್ನು ಎಲ್ಲಾ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಸಾಧಿಸುವ ಗುರಿಯನ್ನು ಇಟ್ಟುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಈ ಸಾಧನೆಗಾಗಿ ಕಲಿಕಾ ಪ್ರಕ್ರಿಯೆಯ ಸಾಧ್ಯತೆಗಳನ್ನು ಸೂಚಿಸುವ 'ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿ' ಮತ್ತು ಶಿಶುಕೇಂದ್ರಿತ ಕಲಿಕಾ ಪೂರಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನೊಳಗೊಂಡ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ 'ಕಲಿಕಾ ಹಾಳೆ'ಗಳ ಪುಸ್ತಕ ಎಂಬ ಎರಡು ಸಾಹಿತ್ಯಗಳನ್ನು ಸೃಜಿಸಲಾಗಿದೆ. ಈ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳಲ್ಲಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಕಲಿಯಲೇ ಬೇಕಾದ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆ ಮತ್ತು ಕಲಿಕಾಫಲಗಳನ್ನು ಕೇಂದ್ರೀಕರಿಸಿದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಬಳಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸಲು ಎಲ್ಲಾ ಭಾಗೀದಾರರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕಾಗಿ ಈ ಮೂಲಕ ವಿನಂತಿಸುತ್ತೇನೆ. ಈ ಕಾರ್ಯಾಭಿವೃದ್ಧಿಯಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ ಇಲಾಖಾ ಮಿತ್ರರು ಮತ್ತು ಅಜೀಂ ಪ್ರೇಮ್‌ಜೀ ಫೌಂಡೇಶನ್ ಇವರಿಗೆ ಅಭಿನಂದನೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸಿದೆ.

ಶುಭವಾಗಲಿ.

**ಶ್ರೀಮತಿ ಸುಮಂಗಲ ವಿ**
**ನಿರ್ದೇಶಕರು,**
**ರಾಜ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು**

<table>
<tr><td colspan="2">मार्गदर्शक<br>श्री.एम.एम.सिंधूर<br>प्राचार्य आणि उपनिर्देशक (अभिवृद्धी)<br>जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था बेळगावी</td></tr>
<tr><td colspan="2">संयोजक<br>श्री प्रकाश.आर.पाटील अधिव्याख्याता<br>जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था बेळगावी</td></tr>
<tr><td colspan="2">संपन्मुल समूह</td></tr>
<tr><td>श्री.सागर आर.हराडे स.शि.<br>सरकारी उच्च प्राथमिक मराठी शाळा<br>हिंडलगा,बेळगावी ग्रामीण.</td><td>श्री.पी. एस.पाटील स.शि.<br>सरकारी उच्च प्राथमिक मराठी शाळा<br>यडोगा,ता.खानापूर</td></tr>
<tr><td>श्री.व्ही.के.बापशेट स.शि.<br>सरकारी उच्च प्राथमिक मराठी शाळा नागुर्डे,<br>ता.खानापूर</td><td>श्री ए.एस. हंगीरकर स.शि.<br>सरकारी उच्च प्राथमिक मराठी शाळा<br>पारवाड,ता.खानापूर.</td></tr>
<tr><td>श्री.व्ही एम.पाटील स.शि.<br>सरकारी उच्च प्राथमिक मराठी शाळा<br>होणकल,ता.खानापूर.</td><td>श्री एन.एल.शिवनगेकर स.शि.<br>सरकारी उच्च प्राथमिक मराठी शाळा<br>करंबळ,ता.खानापूर</td></tr>
<tr><td colspan="2">परिशीलक</td></tr>
<tr><td>श्री महेश उत्तुरकर स शि ,सरकारी सरस्वती माध्यमिक शाळा शहापूर, बेळगावी</td><td>श्री बालाजी जाधव .सरकारी मराठी माध्यमिक शाळा आमटे ,ता.खानापूर</td></tr>
<tr><td colspan="2">भागीदार<br>अजीम प्रेमजी फौंडेशन<br>बेंगळूरू</td></tr>
</table>

# अध्ययन पुनर्प्राप्ती –पार्श्वभूमी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात प्रत्येक वर्ष अमूल्य आहे. शालेय शिक्षणात त्यांचा शैक्षणिक अनुभव ज्ञानासाठी , व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचा आहे. अशा तऱ्हेने एखादं शैक्षणिक वर्ष किंवा आणखी कोणत्यातरी कारणामुळे खंडित झाले किंवा व्यवस्थितपणे चालले नाही तर काय होईल? त्याचे परिणाम पुढील प्रक्रियेसाठी कसे बाधा आणतात? हे कोविड संकटाने दाखवून दिले आहे. एका अध्ययनाचा प्रकार कोविड कारणामुळे जगातील 190 देशांमधील शाळा प्रभावित झाल्या किंवा चालल्या नाहीत. या पिढीच्या बौद्धिक विकासावर होणारे परिणाम सर्वांना भोगावे लागले आहेत. असा परिणाम पुढील दिवसांमध्ये सुद्धा उद्भवू शकतो असे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

आता कोविड संकट एका स्तरावर येऊन थांबले आहे. जगातील अनेक देशानी शिक्षण क्षेत्रात उद्भवलेल्या संकटाचे निवारण करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. भारतामध्ये सुद्धा हे चाललेले आहे. महत्त्वकांक्षी 'राष्ट्रीय शिक्षण नीती' 2020 ची अंमलबजावणी आणि त्याचा भाग असलेली 'निपून भारत मिशन' चे 2026 पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या सर्व मुलांना पायाभूत साक्षरता आणि गणितीय अंकज्ञान देण्याचे ध्येय आमच्या समोर आहे.

कर्नाटकामध्ये लॉकडाउनच्या कारणामुळे शाळा बंद असताना विद्यागम, संवेद, विशेष सेतुबंध इत्यादी पर्यायी कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून शिकवण्याची प्रक्रिया चालू ठेवण्यात आली. नोव्हेंबर 2021 मध्ये शाळांचा पुनः आरंभ झाल्यावर पर्यायी शैक्षणिक योजनेद्वारे शिक्षण निरंतर चालू ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. अशा अनेक प्रयत्नापैकी या वर्षीचा आणखी एक उपक्रम म्हणजे 'अध्ययन पुनर्प्राप्ती ' (कलिका चेतरिके ) 2023. सुमारे दोन वर्षाची शैक्षणिक प्रक्रिया पूर्णपणे न चालल्यामुळे मुलांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्याच्या पार्श्वभूमीवर नियमितपणे व व्यवस्थितपणे हा कार्यक्रम पुढील वर्षासाठी राज्यभर लागू करण्यात आला आहे.

**कार्यक्रमाचे ध्येय** -

2022 -23 चे शैक्षणिक वर्ष 'अध्ययन पुनर्प्राप्ती' वर्ष म्हणून घोषित केल्यामुळे राज्यभर निर्धारित एक रूप शैक्षणिक प्रक्रिया जारी करण्यात आली आहे.

सर्व विद्यार्थ्यांच्या भावनात्मक गरजांच्या पाठबळासाठी लक्ष वेधी शिक्षण प्रक्रियेचे आकलन करून घेणे.

सप्टेंबर 2022 पर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यात पायाभूत साक्षरता आणि पूर्व इयत्तांच्या आवश्यक अध्ययन निष्पती साठी उपक्रम राबविणे.

मार्च 2023 पर्यंत प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याने सध्याच्या वर्गातील आवश्यक निष्पत्ती साध्य करण्यासाठी उपक्रम राबविणे.

एकूणच 2022- 23 शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभा वेळी प्रत्येक विद्यार्थी आपल्या इयत्तेचा अध्ययन स्तर कोणत्याही अडी अडचणी विना साध्य करण्यासाठी सज्ज करणे.

## अध्ययन पुनर्प्राप्ती कार्यक्रमाचा पुनर्विचार -

दोन वर्षाच्या खंडित अध्यापना नंतर वर्गात प्रवेश घेतलेल्या मुलाचा संबंध येईल. शिकविण्यास पाठ प्रारंभ केल्यास मुलाला काय शिकविले तर साध्य होईल ? हा तुमच्या विचाराधीन विषय होईल . हे अध्ययन अंतर पार करण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात, असे सर्वेक्षण सांगते. तरीपण उपलब्ध वेळेचा उपयोग करून मुलांचे अध्ययन अंतर कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ही अध्ययन पुनर्प्राप्ती कार्यक्रम प्रक्रियेचा पुनर्विचार हे कार्य पाठ्यपुस्तकातील कोणताही पाठ कमी न करता मुलांच्या पुढील अध्ययनास अनुकूल होईल अशी अध्ययन निष्पत्ती ध्यानात ठेवून, वर्गवार कृतींची रचना करण्यात आली आहे. अशा तऱ्हेने मुलांच्या सामाजिक, भावनिक अंशाचा विचार करून कृतीआधारित पाठ्यक्रमाची रचना करण्यात आली आहे.

## अध्ययन पुनर्प्राप्ती कार्यक्रमामध्ये FLN

भाषा अध्ययनामध्ये प्रामुख्याने भाषेमधील अर्थपूर्ण वाचन, लेखन आणि गणित अध्ययनामध्ये संख्याज्ञान बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या मूलभूत क्रियांचा सामावेश होतो . ही मूलभूत सामर्थ्ये पुढील अध्ययनाचा आधार असतात. आताच्या परिस्थितीचा विचार केल्यास (1-9) बहुतेक सर्व इयत्तेच्या मुलांमध्ये हे अध्ययन अंतर दिसून आले आहे. राष्ट्रीय शिक्षण नीती 2020 कोविड संक्रमणाच्या अगोदर FLN प्रामुख्याने उचलून धरण्यात आली आहे. तरीपण अनेक सर्वेक्षणांमधून भारतामध्ये पाच कोटी पेक्षा जास्त मुलांना चौथीपर्यंत पोहोचले तरी अर्थपूर्ण वाचन तसेच गणितामधील सरळ उदाहरणे सोडविण्यात अडचणी येतात तसेच कोविंड काळात ही परिस्थिती आणखीच बिघडली. राष्ट्रीय शिक्षण नीती 2020 मधील FLN ला समर्थपणे हाताळण्यासाठी निपून भारत हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. अजून हा कार्यक्रम अंमलबजावणी स्तरावर आहे. निपून भारतने ठरविलेल्या अध्ययन निष्पत्ती बघून त्यामध्ये या ‘अध्ययन पुनर्प्राप्ती’ (कलिका चेतरिके) कार्यक्रमाला आवश्यक अध्ययन निष्पत्तीना जोडून सामुग्रीची रचना करण्यात आली आहे.1ते 9 इयत्तेपर्यंत या FLN सामुग्री आवश्यक असल्याकारणाने पहिल्यांदा पहिली ते तिसरी पर्यंत FLN मूळ आधार झाल्यामुळे त्यासाठी प्रथम सामग्री तयार करून त्या सामग्रीचा इयात्तावर विद्यार्थ्यासाठी उपयोग करण्याच्या संदर्भात माहिती देण्यात आली आहे.

इयत्तावार निर्दिष्टित अंशाचे अध्यापन

प्रत्येक विषयामध्ये इयत्तावार निर्दिष्टित केलेल्या अध्ययन निष्पत्ती आहेत. सामान्य स्थितीत शिक्षक अध्ययन निष्पत्ती इयत्ता वार लक्षात घेऊन अध्यापन प्रक्रियांची रचना करून जात असत . तरी आता मुलांमध्ये अध्ययन अंतर आहे. यासाठी संबंधित इयत्ताना निर्दिष्टित अध्ययन निष्पत्तीची पुनर्बांधणी करून देण्यात आली आहे. यामुळे कमी कालावधीत आवश्यक अध्ययन निष्पत्ती FLN बरोबर साध्य करण्यासाठी मदत होते.

## संपन्नमूल : परिचय आणि वापर

Covid-19 चा दुष्परिणाम म्हणून एक शैक्षणिक वर्षामध्ये योग्य रीतीने औपचारिक शिक्षण न देता विद्यार्थ्यांना बढती देण्यात आली, या कालखंडात जे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले . ते पुढील वर्षांमध्ये भरून काढणे अतिशय कष्टप्रद झाले आहे, शिवाय आतापर्यंत मिळविलेल्या शैक्षणिक सामर्थ्याचे विस्मरण झाल्याने सर्व इयत्तांचे व सर्व विषयांची पायाभूत सामर्थ्ये पूर्णपणे विद्यार्थ्यांच्या विस्मरणात गेली आहेत हे सत्य आहे. म्हणून हे शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी दोन प्रकारे संपन्मूल (रिसोर्स) तयार करण्यात आली आहेत.

सूलभक/शिक्षक हस्तपुस्तिका (RESORCE PERSONAL DAIRY ) ही चौथी ते नववी इयत्ता साठी सर्व विषयातील अंतर्भूत असलेल्या अध्ययन निष्पत्ती साठी मार्गदर्शन करते. अध्ययन निष्पतिंची निवड करताना मागील दोन इयत्तांची अध्ययन निष्पत्ती तसेच पुस्तक येथील आवश्यक निष्पन्न यांची निवड करण्यात आली आहे निवडलेली अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी योग्य अध्ययन कृतींची निवड करण्यात आली आहे तसेच त्या कृती अध्ययन-अध्यापन प्रक्रिया मध्ये कशा प्रकारे सम्मिलीत केली पाहिजे याचे मार्गदर्शन सुलभक हस्तपुस्तिका (RESORCE PERSONAL DAIRY ) मध्ये मार्गदर्शित केली आहे.

शिक्षक हस्तपुस्तिकेत पायाभूत सामर्थ्ये वाढवण्यासाठी आवश्यक अशा अध्ययन क्रिया व कृतीचा अंतर्भाव करण्यात आला असून पाठ्य व पाठ्येतर ही सामाविष्ठ करण्यात आल्या आहेत. तसेच काही आदर्श कृतींची रचना करून देण्यात आल्या आहेत.

हस्तपुस्तिकेत मार्गदर्शन केल्याप्रमाणे अध्ययन प्रक्रियेमध्ये विध्यार्थ्यांना मार्गदर्शक अशी कृती पत्रके ही जोडण्यात आली आहेत.

शिक्षक हस्तपुस्तिकेतील मुख्य अंश.

1. अध्ययन निष्पत्तीचे नाव - निवड करण्यात आलेल्या इयत्ता व विषयांच्या अध्ययन निष्पत्तीचे नाव ठळकपणे नमूद करण्यात आले आहे.

2. अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती व महत्त्व.- निवडलेल्या अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती कशा प्रकारची आहे. विद्यार्थ्याने कोणते शैक्षणिक फलितांश साध्य केले पाहिजे याची संपूर्ण कल्पना सुलभकाला असली पाहिजे. सदर अध्ययन निष्पत्ती मागील इयत्ते पासून प्रस्तुत इयत्तेशी संबंधित आहे. याचे विवरण यामध्ये देण्यात आले आहे.

3. अध्ययन निष्पत्ती च्या साध्यते साठी कृती- अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी सुलभक आपली शक्ती, ज्ञान व अनुभवाचा कसा उपयोग करू शकतात याचे विवरण यामध्ये देण्यात आले आहे.

- प्रत्येक अध्ययन निष्पत्तीसाठी 4 ते 5 आदर्श कृती देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक कृती मधून काय साध्य होऊ शकते, त्याप्रमाणे कृतींची निवड करण्यात आली आहे.

- उद्देश : प्रत्येक कृतीचा उद्देश सांगून त्या कृती कशा घ्यावात, यासाठी शिक्षकांना/सुलभकाना स्पष्टपणे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

- कृती विवरण अध्ययन निष्पत्ती च्या पूर्तीसाठी अध्ययन-अध्यापना बाबत कृतीचे विवरण करून वर्ग प्रक्रियेत या कृती घेण्यासाठी तसेच इतर कृतींचे नियोजन करण्यासाठी व कला एकात्मिक कृती बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

- निष्पत्ती ग्रहण करण्यासाठी आवश्यक चित्रे तसेच पाठ्य पुस्तका व्यतिरिक्त इतर साहित्याच्या वापरासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिंतन, मनन प्रक्रिया वाढवण्यासाठी व सकारात्मक सहभागासाठी संशोधनात्मक प्रश्न देण्यात आले आहेत.

- स्तर ( पायऱ्या): विद्यार्थ्यांनी सर्व कृती केल्यानंतर ते सामर्थ्य अथवा ती निष्पत्ती मिळवली आहे की नाही ते पाहण्यासाठी शिक्षकांनी/सुलभकांनी निरीक्षण करण्याच्या पायऱ्या देण्यात आल्या आहेत, प्रत्येक अध्ययन निष्पत्ती मूल्यमापनाची प्रक्रिया येथे सुचविली आहे.

अध्ययन निष्पतीच्या निश्चितीबाबत

अध्ययन पूर्णप्राप्ती /कलिका चेतरीके कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक विषयातील मागील तीन वर्षामध्ये भौतिक वर्गप्रक्रियेच्या आभावाने अपेक्षित फल किंवा सामर्थ्य प्राप्ती झाली नसल्याने ती प्राप्ती करणे हाच अध्ययन पूर्णप्राप्ती / कालिका चेतरीके कार्यक्रमाचा मुख्य हेतू होय. या अंतर्गत विद्यार्थ्यामध्ये सामर्थ्य विस्मरण किंवा दुर्लक्षित झालेल्या सामर्थ्याची प्राप्ती होणे क्रमप्राप्त आहे. या साठी शैक्षणिक प्रक्रिया व अध्ययन प्रक्रिया यामध्ये बदल घडविणे गरजेचे आहे. या बदलाची कार्य प्रणाली म्हणजे अध्ययन पूर्णप्राप्ती / कालिका चेतरीके 2022-23 मधून शैक्षणिक प्रक्रियेतून कार्यान्वित करत आहोत. मुख्यतः अध्ययन फल म्हणजेच अध्ययन निष्पत्ती होय.अध्ययन निष्पत्ती निश्चिती करणामुळे ‘अध्ययन निष्पतीचे समायोजन' असे ही या कार्यक्रमाला संबोधीत करू शकतो. सदर शैक्षणिक वर्षात मागील दोन इयत्तांच्या सर्व आवश्यक निष्पतींचे व प्रस्तुत इयत्तेच्या सर्व निष्पतींना आद्यता देऊन उपयोगीकृत केली आहे.

-

अध्ययन निष्पत्ती निश्चिती स्वरूपाबाबत स्पष्ट चित्रण

| इयत्ता | इयत्ता पूर्व इयत्ता (उदा.5 वी ) | पूर्व इयत्ता (उदा.6 वी ) | प्रस्तुत इयत्ता (उदा.7 वी ) |
|---|---|---|---|
| शैक्षणिक वर्ष | 2020-21 | 2021-22 | 2022 -23 |
| अध्ययन निष्पत्ती | येथें मागील इयत्तेतील अध्ययन निष्पत्ती यादीतील आद्य क्रम व व्याप्ती याचा विचार करुन अध्ययन निष्पत्ती निवडली आहे . | येथें मागील इयत्तेतील एकूण निष्पत्ती आधारित आद्य क्रम, व्याप्ती व साम्यतेच्या निकषावर निष्पत्ती निवडली आहे . | येथे प्रस्तुत वर्षातील सर्व अध्ययन निष्पत्ती यांची व्याप्ती व साम्यतेच्या निकषावर निवड केली आहे. |

शिक्षकांना/सुलभकांना सूचना

1. अध्ययन निष्पत्ती निश्चितीबाबत ची रूपरेषा शिक्षकांनी समजून घ्यावी

2. अध्ययन निष्पत्ती ची यादी, वेळापत्रक, पाठ संबंध व मूल्यमापन संबंधित जाणून घ्यावे.

3. अध्ययन निष्पत्ती व पाठ संबंध जाणून आपण वेळापत्रकाचा व अंदाजपत्रकाचा ताळमेळ जमवावा यासाठी निश्चित अध्ययन सहज व परिणाम कारक होईल.

4. शिक्षक हस्तपुस्तिका आणि विद्यार्थी कृतिपुस्तिका याचा सहसंबंध ओळखून त्याच्या उपाययोजनेचे गमक वाचनाद्वारे जाणावे.

5. शिक्षकाने विद्यार्थी कृती पुस्तिका वापराबाबत दक्ष व सतत विद्यार्थी प्रेरित असावे.

6. निष्पत्ती आधारित कृती व कृती आधारित विद्यार्थी कार्य वेळोवेळी वेळेत पूर्ण करण्याचा कल असावा.

7. विद्यार्थी कृती हस्तपुस्तिका मधील मूल्यमापन कृती पत्रकाचा वापर आपण वेळोवेळी आकारिक (F.A.) मूल्यमापनाच्या आधीन ग्राह्य धरू शकतो व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करू शकतो.

8. विद्यार्थी कृती हस्तपुस्तिकेत मूल्यमापन कृती पत्रकात दिलेले विद्यार्थी स्वयंमूल्यमापनातून विद्यार्थी दर्जा मापन करता येते.

9. अध्ययन निष्पत्ती प्राप्ती मूल्यमापन करिता विद्यार्थी कृती हस्तपुस्तिकेत मूल्यमापन पत्रकेत विद्यार्थी अध्ययन स्तर शिक्षकांनी नोंद करून अध्ययन निष्पत्तची प्राप्ती ठरवावी.

10. विद्यार्थी कृती पुस्तकातील मूल्यमापन पत्रकात "शिक्षक मूल्यमापन" किंवा "प्रोत्साहन शेरा" दिला आहे. याद्वारे निष्पती शेवटी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन शब्दांद्वारे प्रेरित करावे. जेणेकरून पुढील निष्पत्ती प्राप्तिबद्दल आवड व जिज्ञासा निर्माण होईल.

*****************************************************

## अध्ययन निष्पत्ती

| अ.क्र | अध्ययन निष्पत्ती | पान क्र. |
|---|---|---|
| 1. | व्याकरण आणि भाषा नियम समजून घेऊन योग्यरीतीने वाचन व लेखनाची पद्धत अवगत करतात. | 1-2 |
| 2. | विषयाचे श्रवण किंवा वाचन केल्यानंतर का ? कसे ? असे झाले तर?, असे झाले नाही तर ? अशा प्रश्नांची उत्तरे देतात. | 3-5 |
| 3. | व्याकरणातील शब्दांच्या जाती ,प्रयोग इत्यादी अंश समजावून घेऊन त्यांचा वापर करून लेखन करतात. | 5-9 |
| 4. | शब्दातील साम्यता आणि अक्षरातील, ध्वनीतील फरक समजून घेऊन छापील तसेच लिखित मुद्दे वाचतात व त्यांचे अनुलेखन व श्रुतलेखन करतात. | 9-12 |
| 5. | घटना, प्रसंग वाचून त्या योग्य क्रमानुसार लावतात. | 13-15 |
| 6. | भित्तिपत्रके तयार करतात आणि इतरांच्या भित्तिपत्रकांचे वाचन करून समजून घेतात. | 15-17 |
| 7. | कविता, कथा, नाटक ऐकून त्याचा अर्थ समजून घेऊन त्यावरील प्रश्नांची उत्तरे देतात व कवितेचा सारांश लिहितात. | 18-20 |
| 8. | प्रासयुक्त,यमकयुक्त शब्दांची रचना करतात आणि स्वतः कविता रचतात. | 20-22 |
| 9. | नवीन शब्द, शब्दसमूह, वाक्प्रचार,म्हणी, मुद्रित विषय वाचून अर्थ समजून घेऊन त्यांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करतात. | 23-25 |
| 10 | चित्रावरून कथा / गोष्ट सांगतात व लिहितात. | 26-28 |
| 11. | कथेचे नाटकात आणि नाटकाचे कथेत रूपांतर करतात. | 28- 30 |
| 12 | दिलेल्या सूचनांचा अवलंब करून शब्दकोडे सोडवितात. | 31- 33 |
| 13 | दिलेल्या विषयावर निबंध, पत्रे, प्रवासवर्णने स्वतःच्या शब्दात लिहितात. | 33-36 |
| 14 | अपरिचित प्रसंग, घटना, नाटक आणि संदर्भ ऐकून अर्थ समजून घेऊन प्रतिक्रिया व्यक्त करतात व त्यात सहभागी होतात. त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देतात. | 37-41 |

# अध्ययन निष्पत्तीचे माहेवार वेळापत्रक

| अ.क्र. | महिना | अध्ययन निष्पत्ती क्र. | आकारिक /संकलनात्मक मूल्यमापन |
|---|---|---|---|
| 1 | मे | 1) व्याकरण आणि भाषानियम समजून घेऊन योग्यरीतीने वाचन व लेखनाची पद्धत अवगत करतात. | आकारिक मूल्यमापन 1 ( FA 1)<br><br>जुलै दुसरा आठवडा |
| 2 | जून | 1) व्याकरण आणि भाषानियम समजून घेऊन योग्यरीतीने वाचन व लेखनाची पद्धत अवगत करतात.<br><br>2) विषयाचे श्रवण किंवा वाचन केल्यानंतर का ? कसे ? असे झाले तर?, असे झाले नाही तर ? अशा प्रश्नांची उत्तरे देतात. | |
| 3 | जुलै | 3) व्याकरणातील शब्दांच्या जाती ,प्रयोग इत्यादी अंश समजावून घेऊन त्यांचा वापर करून लेखन करतात. | |
| 4 | ऑगस्ट | 4) शब्दातील साम्यता आणि अक्षरातील, ध्वनीतील फरक समजून घेऊन छापील तसेच लिखित मुद्दे वाचतात व त्यांचे अनुलेखन व श्रुतलेखन करतात.<br><br>5) घटना, प्रसंग वाचून त्या योग्य क्रमानुसार लावतात. | FA 2<br>सप्टेंबर –दुसरा आठवडा<br><br>SA 1<br>ऑक्टोबर –शेवटचा आठवडा |
| 5 | सप्टेंबर | 6) भित्तिपत्रके तयार करतात आणि इतरांच्या भित्तिपत्रकांचे वाचन करून समजून घेतात. | |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | ऑक्टोबर | 7) कविता, कथा, नाटक ऐकून त्याचा अर्थ समजून घेऊन त्यावरील प्रश्नांची उत्तरे देतात व कवितेचा सारांश लिहितात. | |
| 7 | नोव्हेंबर | 8) प्रासयुक्त,यमकयुक्त शब्दांची रचना करतात आणि स्वतः कविता रचतात.<br><br>9) नवीन शब्द, शब्दसमूह, वाक्प्रचार,म्हणी, मुद्रित विषय वाचून अर्थ समजून घेऊन त्यांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करतात. | FA 3<br>डिसेंबर – शेवटचा आठवडा |
| 8 | डिसेंबर | 10) चित्रावरून कथा / गोष्ट सांगतात व लिहितात. | FA 4<br>मार्च दुसरा आठवडा<br><br>SA 2<br>मार्च शेवटचा आठवडा |
| 9 | जानेवारी | 11) कथेचे नाटकात आणि नाटकाचे कथेत रूपांतर करतात.<br>12) दिलेल्या सूचनांचा अवलंब करून शब्दकोडे सोडवितात. | |
| 10 | फेब्रुवारी | 13) दिलेल्या विषयावर निबंध, पत्रे, प्रवासवर्णने स्वतःच्या शब्दात लिहितात. | |
| 11 | मार्च | 14) अपरिचित प्रसंग, घटना, नाटक आणि संदर्भ ऐकून अर्थ समजून घेऊन प्रतिक्रिया व्यक्त करतात व त्यात सहभागी होतात. त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देतात. | |

अध्ययन निष्पत्ती क्र. 7.1

व्याकरण आणि भाषा नियम समजून घेऊन योग्यरीतीने वाचन व लेखनाची पद्धत अवगत करतात .

अध्ययन कृती क्रमांक 1.1

अध्ययन कृतीचे नाव : चला मुळाक्षरे ओळखू .

उद्देश : विद्यार्थी मुळाक्षरे समजून घेतील व ऱ्हस्व स्वर, दीर्घ स्वर,संयुक्त स्वर,स्वरादी असे वर्गीकरण करतील.

कृतीचे विवरण :

दिलेल्या स्वरांच्या तक्त्यातील ऱ्हस्व स्वर, दीर्घ स्वर , संयुक्त स्वर,स्वरादी असे स्वरांचे वर्गीकरण समजावून सांगून , वेगवेगळ्या स्वरांच्या पट्ट्या देऊन त्यातील ह्रस्व स्वर, दीर्घ स्वर, संयुक्त स्वर, स्वरादी वेगळे करण्यास देणे.

शैक्षणिक साहित्य : स्वराक्षरांच्या पट्ट्या

संबंधित पाठ क्रमांक : व्याकरण

विद्यार्थी कार्यपुस्तिकेतील कृती क्रमांक : 1.1

मूल्यमापन कृती क्रमाक 1.2

मूल्यमापन कृतीचे नाव : व्यंजनांचे वर्गीकरण

उद्देश : मराठी भाषेतील व्यंजनांची ओळख करून घेऊन त्यांचे वर्गीकरण करतील.

कृतीचे विवरण :

व्यंजनयुक्त अक्षरे लिहिलेला तक्ता / पट्ट्या देऊन विद्यार्थ्यांकडून त्यांचे वाचन व लेखन करून घेणे. उच्चार स्थानावरून त्यांचे वर्गीकरण करून घेणे. व्यंजनांचे वर्गीकरण समजावून सांगणे .विद्यार्थ्याकडून तक्ता वर्गीकरण करून वाचून घेणे.

शैक्षणिक साहित्य : अक्षर तक्ता,अक्षर पट्ट्या.

संबंधित पाठ क्रमांक : व्याकरण

विद्यार्थी कार्यपुस्तीकेतील कृती क्रमांक :1.2

अध्ययन कृती क्रमांक : 1 .3

कृतीचे नाव : अक्षर-अक्षर जोडू

उद्देश : विद्यार्थी अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द व वाक्ये बनवतील .

कृतीचे विवरण :

- चौदाखडीतील विविध अक्षरांचा वापर करून दोन अक्षरी , तीन अक्षरी .......असे विविध अर्थपूर्ण शब्द तयार करून घेणे. वाचून घेणे आणि लिहून घेणे.
- जोडाक्षरयुक्त शब्दांचे लेखन आणि वाचन घेणे.
- विविध शब्द जुळवून अर्थपूर्ण वाक्ये बनविणे .

शैक्षणिक साहित्य : विविध शब्दपट्ट्या, वाक्य पट्ट्या

संबंधित पाठ क्रमांक : 17, व्याकरण.

विद्यार्थी कार्यपुस्तीकेतील कृती क्रमांक- 1.3

**अध्ययन कृती** क्रमांक : 1.4

**कृतीचे नाव** : विरामचिन्हे वापरू – शुद्धलेखन करू

**उद्देश** : मुले योग्य विरामचिन्हांचा वापर करून लेखन करतील.

**कृतीचे विवरण :**

- विराम चिन्हांची ओळख करून देणे . विविध उदाहरणासह मुलाना विरामचिन्हांचा उपयोग दाखवून देणे.
- विरामचिन्ह रहित विविध वाक्ये , उतारा देऊन त्यामध्ये योग्य विरामचिन्हांचा वापर करून लिहिण्यास प्रोत्साहन देणे.

शैक्षणिक साहित्य : विराम चिन्हांचा तक्ता, वेगवेगळ्या वाक्य पट्ट्या, उतारे

संबंधित पाठ क्रमांक : 20, व्याकरण

विद्यार्थी कार्यपुस्तीकेतील कृती क्रमांक : 1.4

**अध्ययन निष्पत्ती क्र. 7.2**

विषयाचे श्रवण केल्यानंतर किंवा वाचन केल्यानंतर का? कसे? असे झाले तर ? असे झाले नाही तर ? अशा प्रश्नांची उत्तरे देतात .

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :**

1) दिलेला विषय वाचून किंवा ऐकून समजावून घेतात.

2) विषय समजावून घेऊन त्यावरील विविध प्रश्नाची उत्तरे देतात .

**अध्ययन कृती क्र. 2 .1**

**कृतीचे नाव** : उतारा वाचा आणि उत्तरे लिहा .

**उद्देश** : दिलेला उतारा वाचून त्यावरील प्रश्नाची उत्तरे देतील

**कृतीचे विवरण** :

- शिक्षकांनी मुलांकडून उतारा वाचून घ्यावा किंवा तो स्वतः शिक्षकांनी वाचून दाखववावा
- मुलांना त्याचे श्रवण करण्यास सांगावे .
- नंतर त्या उताऱ्यावर आधारित प्रश्न मुलांना देऊन त्याची उत्तरे लिहून घ्यावीत .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : विविध उताऱ्यांच्या मुद्रित पट्ट्या आणि त्यावरील प्रश्नांच्या पट्ट्या

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : माझी आई , आमचा राष्ट्रीय खेळ हॉकी ,डॉ .चंद्रशेखर व्यंकट रामन , वयाची अट नाही

**विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र** : 2.1

**अध्ययन कृती क्र. 2.2**

**कृतीचे नाव : कविता वाचा आणि उत्तरे लिहा .**

**उद्देश** : विद्यार्थी विविध कविता वाचून त्याचा भावार्थ समजून घेऊन विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देतात .

**कृतीचे विवरण** :

- विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना एखादी कविता वाचनास द्यावी .
- विद्यार्थी गटामध्ये चर्चा करून त्यातील भावार्थ जाणून घेऊन त्यावर विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहितील .
- आवश्यक तेथे शिक्षक मार्गदर्शन करतील .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : कविता संग्रह , 7 वी मायमराठी पुस्तकातील कविता

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : 7 वी मायमराठी पुस्तकातील कविता

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र** : 2.2

**अध्ययन कृती क्र : 2.3**

**कृतीचे नाव : संवाद वाचा – उत्तरे द्या**

**उद्देश** : दिलेला संवाद वाचून समजावून घेऊन त्यावरील प्रश्नाना उत्तरे देतील .

**कृतीचे विवरण :**

- संवाद / संभाषणाच्या पट्ट्या मुलांना देऊन त्यावरील प्रश्न फळ्यावर लिहून संवादाचे प्रकट वाचन वर्गात मुलांकडून करून घ्यावे .
- इतर मुलांनी संवाद ऐकून विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे लिहावीत .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : संवाद / संभाषणाच्या पट्ट्या , त्यावरील प्रश्नावली

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : आम्ही टिकलो तर तुम्ही टिकाल

**विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र** : 2.3

**अध्ययन कृती क्र : 2.4**

**कृतीचे नाव : गोष्ट वाचू – बदल करू**

**उद्देश** : एखादी परिचित गोष्ट वाचून किंवा ऐकून त्यामध्ये बदल करून लिहितील / सांगतील .

**कृतीचे विवरण :**

- विद्यार्थ्यांना परिचित असलेली एखादी गोष्ट सांगावी किंवा वाचायला द्यावी .
- मोबाईलचा वापर करून व्हिडीओसुद्धा दाखवता येईल .
- नंतर त्या गोष्टीतील एखादे पात्र जर बदलले तर .................... किंवा गोष्टीचा शेवट बदलून लिहायचा झाल्यास तो कसा असेल ? याविषयी प्रश्न विचारून ती गोष्ट पुन्हा नवीन पात्रांसह किंवा शेवट बदलून लिहून घेणे.

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : गोष्टींची पुस्तके , गोष्टींच्या ध्वनिफिती / चित्रफिती

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** :परोपकाराचे फळ , तीन प्रश्न ,जावयाची करामत

**विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र**. : 2.4

**अध्ययन निष्पत्ती 7.3**

व्याकरणातील शब्दांच्या जाती ,प्रयोग इत्यादी अंश समजावून घेऊन त्यांचा वापर करून लेखन करतात .

**अध्ययन निष्पत्ती ची व्याप्ती आणि महत्त्व :**

1) वाक्यातील नाम व सर्वनाम ओळखतात.

2) विशेषण व क्रियाविशेषण यामधील फरक ओळखतात.

3) शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय यातील फरक ओळखून त्यांचा वाक्यात वापर करतात.

**अध्ययन कृती** क्रमांक 3.1

**कृतीचे नाव** : नाम की सर्वनाम

**उद्देश** : दिलेल्या वाक्यांतील नाम आणि सर्वनाम ओळखतील .

**कृतीचे विवरण**

- नाम आणि सर्वनाम म्हणजे काय हे उदाहरणासह शिक्षकांनी सर्वप्रथम समजावून द्यावे .
- नंतर शब्द पट्ट्या देऊन त्यातील नाम व सर्वनामांच्या पट्ट्या वेगवेगळ्या करून घ्याव्यात व त्यांची यादी करून घ्यावी.
- वेगवेगळी वाक्ये देऊन त्यातील नाम व सर्वनाम ओळखून लिहिण्यास सांगावे .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : कार्डशीट, मार्कर, शब्दपट्ट्या ,व्याकरणाचे पुस्तक

**कृतीचा पाठ्यापुस्ताकाशी संबंध** : इयत्ता 6 वी माय मराठी पुस्तकातील पान क्र. 68 ,69,100,101

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्रमांक** : 3.1

**अध्ययन कृती क्रमांक** : 3.2

**कृतीचे नाव** : विशेषण की क्रियाविशेषण

**उद्देश** : दिलेल्या वाक्यातील विशेषणे आणि क्रियाविशेषणे यातील फरक ओळखतील

**कृतीचे विवरण** :

1) शिक्षकांनी प्रथम काही वाक्ये देऊन त्यातील नाम, सर्वनाम आणि क्रियापद ओळखण्यास सांगावे .

2) नंतर त्यातील नाम किंवा सर्वनामाविषयी विशेष किंवा अधिक माहिती सांगणारा शब्द आणि क्रिया पदाविषयी किंवा क्रियेविषयी अधिक माहिती सांगणारा शब्द शोधण्यास सांगून विशेषण व क्रियाविशेषण यांची ओळख करून द्यावी .

विशेषण शोधण्यासाठी **नाम किंवा सर्वनामाला** "कसा ,कशी, कसे, कशा, किती,............." असे प्रश्न विचारावेत ; तर क्रियाविशेषण शोधण्यासाठी वाक्यातील **क्रियापदाला** "कसा ,कशी, कसे, किती, कुठे, केव्हा ,कधी,.............. असे प्रश्न विचारावेत.

**उदाहरणार्थ -** राहुल हुशार मुलगा आहे ; पण तो हळूहळू लिहितो .

वरील वाक्यात **राहुल** आणि **मुलगा** हे नाम आहे. या नामाला प्रश्न विचारावा . "**राहुल (मुलगा ) कसा आहे**? " त्याचे उत्तर "**हुशार**" हे आहे . **राहुल/ मुलगा** या नामाविषयी अधिक माहिती सांगणारा शब्द **हुशार** ; म्हणून ते विशेषण आहे .

वरील वाक्यात **लिहितो** हे एक **क्रियापद** आहे . "**कसा लिहितो** ?" असा प्रश्न विचारल्यास "**हळूहळू**" हे उत्तर येते . क्रियेविषयी अधिक माहिती सांगणारा शब्द म्हणून **हळूहळू** हे **क्रियाविशेषण** आहे .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : विशेषणे आणि क्रियाविशेषणे यांचा समावेश असलेली वाक्ये , विशेषणे आणि क्रियाविशेषणे यांची यादी , व्याकरणाचे पुस्तक

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : पान क्र. 10 वरील भाषाभ्यास क्रियाविशेषण अव्यय

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र** : 3.2

**अध्ययन कृतीं** : 3.3

**कृतीचे नाव** : **शब्दयोगी अव्यय**

**उद्देश** : विविध शब्दयोगी अव्यय वापरून वाक्यरचना करतील.

**कृतीचे विवरण** :

- शिक्षकांनी प्रथम काही वाक्ये फळ्यावर लिहावीत किंवा वाक्यपट्ट्या तयार कराव्यात व विद्यार्थ्यांना द्याव्यात .
- त्यातील नाम आणि सर्वनामे ओळखण्यास सांगावे. नंतर नाम आणि सर्वनामांना जोडून आलेले शब्द ओळखून लिहिण्यास सांगावे .

**उदाहरणार्थ** – "आमच्या शाळेसमोर मैदान आहे." ह्या वाक्यात

**नाम** - शाळा, मैदान **सर्वनाम** - आमच्या **क्रियापद** - आहे

वरील वाक्यात **शाळा** या नामाला जोडून आलेला शब्द "समोर" हा आहे. म्हणून "समोर" हे शब्दयोगी अव्यय आहे.

अशी अनेक वाक्ये घेऊन शब्दयोगी अव्यय ओळखण्याचा सराव करून घ्यावा .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : शब्दयोगी अव्ययांचा तक्ता ,कार्डशीट ,मार्कर ,व्याकरणाचे पुस्तक

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : पान क्र.30 ,31 वरील भाषाभ्यास ( शब्दयोगी अव्यय )

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र : 3.3**

अध्ययन कृती क्र : 3.4

**कृतीचे नाव : आम्ही जोडतो**

**उद्देश** : उभयान्वयी अव्यये वापरून विवध शब्द आणि वाक्ये जोडून लिहितील .

**कृतीचे विवरण** :

- शिक्षकांनी उभयान्वयी अव्ययांचा अर्थ विविध उदाहरणासह समजावून सांगावा .
- उभयान्वयी अव्यये असलेली वाक्ये किंवा उतारे विद्यार्थ्यांना मुद्रित स्वरुपात द्यावेत किंवा फळ्यावर लिहावेत.
- विद्यार्थी चर्चा करून त्यातील उभयान्वयी अव्यये शोधतील व लिहितील .

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : इयत्ता 7 वी मायमराठी पान क्र. 36 भाषाभ्यास ( उभयान्वयीअव्यय )

**आवश्यक साहित्य** : उभयान्वयी अव्ययांचा तक्ता

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** : 3.4

**अध्ययन कृती 3.5**

**कृतीचे नाव** : चला, भावना व्यक्त करा

**उद्देश** : विविध भावना व्यक्त करण्यासाठी विविध भावदर्शक शब्द वापरतील .

**कृतीचे विवरण** :

- आनंद , दुःख ,आश्चर्य, किळस, राग, पश्चाताप........... अशा विविध भावना व्यक्त करताना आपण वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळे विशिष्ट शब्द वापरतो; त्यांची यादी करून घेणे .
- वेगवेगळ्या संदर्भातील वाक्ये देऊन त्यातील भाव ओळखण्यास सांगणे .
- त्यानुसार दिलेल्या यादीतील योग्य भावयुक्त शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहून घेणे .

उदाहरणार्थ – "किती मोठा हत्ती आहे हा !" ह्या वाक्यातील आश्चर्याचा भाव ओळखून हे वाक्य पुढील प्रमाणे लिहिता येईल . " बापरे ! किती मोठा हत्ती आहे हा !"

अशाप्रकारे विविध वाक्ये देऊन सराव करून घ्यावा

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : केवलप्रयोगी अव्ययांचा तक्ता / शब्दपट्ट्या , व्याकरणाचे पुस्तक

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : इयत्ता 7 वी माय मराठी पुस्तकातील पान क्र. 50 भाषाभ्यास (केवल प्रयोगी अव्यय )

**विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र**. : 3.5

**अध्ययन निष्पत्ती क्र. :** 7.4

शब्दातील साम्यता आणि अक्षरातील , ध्वनीतील फरक समजून घेऊन लिखित मुद्दे वाचतात व त्यांचे अनुलेखन व श्रुतलेखन करतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व** :

- आपल्या दैनंदिन जीवनात आपण एकच शब्द भिन्न अर्थाने वापरत असतो त्या शब्दांची यादी विद्यार्थी करतात .
- ध्वनीत होणारा फरक लक्षात घेऊन त्यानुसार शब्दांचे अर्थ बदलतात अशा शब्दांची यादी तयार करतात .
- अर्थ समजून श्रुतलेखन, अनुलेखन करतात.

**अध्ययन कृती क्र.**: 4.1

**अध्ययन कृतीचे नाव** : "शब्द एक अर्थ अनेक"

**उद्देश**:. :

विद्यार्थी शब्दातील साम्यता आणि अक्षरातील ,ध्वनीतील फरक समजून घेऊन त्यांचे अनुलेखन व श्रृतलेखन करतील.

**कृतीचे विवरण** :

- एकाच शब्दाचे भिन्न अर्थ असलेल्या शब्दांचा तक्ता अथवा शब्दांच्या पट्ट्या दाखवून शिक्षकांनी त्या शब्दांचे वाचन व त्या शब्दांचे विश्लेषण स्वतः करावे.

- नंतर मुलांकडून वाचन करून घ्यावे ; तसेच त्या शब्द /वाक्यांचे / उताऱ्याचे अनुलेखन करून घ्यावे.

**शैक्षणिक साहित्य** : शब्दांचा तक्ता, शब्दांच्या पट्ट्या ,ग्रंथालयातील व्याकरणावर आधारित पुस्तके, पाठ्यपुस्तक

**संबंधित पाठ क्र** : 1,2,14,18

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक** : 4.1 A , 4.1 B

**अध्ययन कृती क्र**.: 4.2

**अध्ययन कृतीचे नाव** : "शब्दाचे अर्थ ओळखा व लिहा."

**उद्देश** : विद्यार्थी शब्दातील साम्यता आणि त्यांचे अर्थ समजून घेऊन अनुलेखन करतील.

**कृतीचे विवरण** :

- विद्यार्थ्यांना वर्तुळाकार बसवून त्यांच्याकडे मूळ शब्द असलेली कार्डे द्यावीत.
- वर्तुळात शब्दांचे अर्थ असलेली कार्डे पसरावीत .
- प्रत्येक विद्यार्थ्याला उभे करून त्यांच्याकडे असलेल्या कार्डावरील शब्दाला जुळणारी अर्थ असलेली वर्तुळातील कार्डे शोधण्यास सांगावीत .

शैक्षणिक साहित्य : शब्द व त्यांची अर्थ असलेली फ्लॅश कार्डे

संबंधित पाठ क्र : 1,2,14,18

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 4.2

**अध्ययन कृती क्र**.: 4.3

**अध्ययन कृतीचे नाव** : "अर्थ ओळखा वाक्य बनवा"

**उद्देश** :

विद्यार्थी शब्दातील साम्यता आणि त्यांचे अर्थ समजून घेऊन त्यांचा अर्थानुसार वाक्यात उपयोग करतील .

**कृतीचे विवरण** :

- भिन्न अर्थ असलेल्या शब्दापासून तयार केलेल्या वाक्यांच्या पट्ट्या मुलांकडे देऊन त्यांचे वाचन करून घ्यावे.
- मुलांच्या संख्येनुसार त्यांचे गट करून त्या गटामध्ये भिन्न अर्थ असलेले शब्द देऊन त्यांचे अर्थ व वाक्ये तयार करून घ्यावीत.

शैक्षणिक साहित्य : शब्द व त्यावरील वाक्यांच्या पट्ट्या ,पाठ्यपुस्तक ,वाचनालयातील व्याकरणाची पुस्तके

संबंधित पाठ क्रमांक : 1,2,14,18

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 4.3

**अध्ययन कृती क्र.: 4.4**

अध्ययन कृतीचे नाव : "शब्द वाच अर्थ ओळख ."

उद्देश :

विद्यार्थी अक्षरातील ध्वनीतील फरक असणारे शब्द ओळखून त्यांचा अर्थ ग्रहण करतील.

कृतीचे विवरण :

- शिक्षकांनी अक्षरातील,ध्वनीतील फरक असणारे शब्द व त्यांचे अर्थ यांचा तक्ता दाखवून त्या शब्दांचे स्पष्ट उच्चारासह वाचन करावे व विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे.
- विद्यार्थ्यांचे दोन गट करून शब्द असलेली कार्डे पहिल्या गटाकडे द्यावीत व संबंधित शब्दाचे अर्थ असलेली कार्डे दुसऱ्या गटाकडे द्यावीत शिक्षकांनी एक शब्द उच्चारावा त्या शब्दाचे कार्ड

असलेला विद्यार्थी व त्या संबंधित शब्दाच्या अर्थाचे कार्ड असलेला विद्यार्थी यांच्या जोड्या तयार कराव्यात.

उदाहरण:--

| **शब्द** | **अर्थ** |
|---|---|
| दिन | दिवस |
| दीन | गरीब |

शैक्षणिक साहित्य : शब्दांचा तक्ता व अर्थ असलेली फ्लॅश कार्डे

संबंधित पाठ क्र : 1,2,14,18

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 4.4

अध्ययन कृती क्रमांक: 4.5

अध्ययन कृतींचे नाव : "चिठ्ठी उचला अर्थ सांगा व वाक्य तयार करा."

उद्देश : विद्यार्थी शब्दांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करतील.

कृतीचे विवरण :

- शिक्षकांनी शब्दांच्या चिठ्ठ्या तयार कराव्यात.
- त्या एका बाउलमध्ये ठेवून एका विद्यार्थ्याला समोर बोलवावे. त्यातली चिठ्ठी उचलण्यास सांगून त्या चिठ्ठीत असलेल्या शब्दाचा अर्थ सांगून त्या शब्दाचा वाक्यात उपयोग करून घ्यावा.
- इतर विद्यार्थ्यांकडून शब्द ,त्याचा अर्थ तसेच त्या संबंधित वाक्य याचे श्रृत लेखन करून घ्यावे.

शैक्षणिक साहित्य : शब्दांच्या चिठ्ठ्या, पाठ्यपुस्तक

संबंधित पाठ क्रमांक: 1,2,14,18

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 4.5

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 5**

घटना प्रसंग वाचून त्या योग्य क्रमानुसार लावतात.

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

- एखाद्या घटनेचे वाचन करून विद्यार्थी ती घटना क्रमानुसार लावतात.
- एखाद्या प्रसंगाची ध्वनिफीत ऐकून अथवा चित्रफित पाहून त्यातील येणाऱ्या घटना क्रमवार लावतात.

**अध्ययन कृती क्र.5.1**

अध्ययन कृतीचे नाव : उतारा वाचा वाक्यपट्ट्या जुळवा

उद्देश : उताऱ्याचे वाचन करून घटना क्रमवार लावण्यास सक्षम बनतील .

कृतीचे विवरण :

- उताऱ्याचे वाचन करून उताऱ्यातील काही वाक्ये उलट सुलट क्रमात याव्यात अशा वाक्यांच्या वाक्यपट्ट्या तयार करणे.
- विद्यार्थ्यांचे गट तयार करून तयार केलेल्या वाक्यपट्ट्या गटामध्ये चर्चा करून क्रमवार जोडण्यास सांगणे.

शैक्षणिक साहित्य : वाक्य पट्ट्या

संबंधित पाठ क्र : 21

विध्यार्थी कार्यपुस्तिका क्र: 5 .1

**अध्ययन कृती क्र.5.2**

अध्ययन कृतीचे नाव : व्हिडीओ पहा- घटना क्रमानुसार लावा.

उद्देश : एखादा प्रसंग ऐकून, पाहून घटना क्रमवार लावतील .

**कृतीचे विवरण :**

- एखाद्या विषयावर आधारित व्हिडिओ दाखववावा .
- मुलानी त्याचे  काळजीपूर्वक श्रवण करावे.  .
- नंतर त्या व्हिडीओवर आधारित काही वाक्ये द्यावीत आणि मुलांना दिलेली वाक्ये  क्रमवार लावण्यास सांगणे.

शैक्षणिक साहित्य : विविध संदर्भातील व्हिडीओ /ऑडीओ

( राणी चन्नम्मा यांच्या जीवन प्रवासाचा व्हिडीओ QR CODE स्कॅन करून दाखवणे )

संबंधित पाठ क्र : 15

विद्यार्थी कार्यपुस्तिका कृती क्र : 5 .2

**अध्ययन कृती क्र.5.3**

अध्ययन कृतीचे नाव : वाक्ये वाचा गोष्ट तयार करा

उद्देश : वाक्ये वाचून गोष्ट तयार करतील.

कृतीचे विवरण :

- विद्यार्थ्यांना एखादी गोष्ट वर्गामध्ये सांगावी . किंवा गोष्टीवर आधारित वाक्ये द्यावीत .
- मुलांनी त्याचे श्रवण करून  त्यावर दिलेल्या उलट-सुलट क्रमाने दिलेली वाक्ये  दिली असता त्या वाक्यांचे वाचन करून त्यांचा योग्य क्रम विद्यार्थ्यांना लावण्यास सांगावा. व गोष्ट तयार करावी.

उदाहरणार्थ : “ससा आणि कासव”  या गोष्टीवर आधारित वाक्ये

शैक्षणिक साहित्य    : वाचनालयातील गोष्टींची पुस्तके .

संबंधित पाठ क्र   : 8

विद्यार्थी कार्यपुस्तिकेतील कृती  क्र    : 5 .3

**अध्ययन कृती क्र.5.4**

अध्ययन कृतीचे नाव : चित्र पहा क्रमानुसार लावा

उद्देश : चित्र पाहून घटनांचा योग्य क्रम लावतील.

कृतीचे विवरण :

- विविध संदर्भाला अनुसरून ( उदा . राष्ट्रीय सणांची चित्रे) चित्रे द्यावीत .
- विद्यार्थी ती चित्रे पाहून त्यातील संदर्भ लक्षात घेऊन ती योग्य क्रमाने जोडतील .

शैक्षणिक साहित्य : विविध संदर्भातील चित्रे .

संबंधित पाठ क्र : 16

विध्यार्थी कार्यपुस्तिका क्र: 5 .4

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 7. 6**

भित्तीपत्रके तयार करतात आणि इतरांच्या भित्तीपत्रकांचे वाचन करतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :**

- भितीपत्रके तयार करतात.
- वेगवेगळ्या ठिकाणाहून प्रसिद्ध होणाऱ्या भित्तीपत्रकांचे वाचन करतात .
- इतरांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकांचे वाचन करतात.
-

**अध्ययन कृती क्र.6.1**

**अध्ययन कृतीचे नाव :** कविता लिहा - भित्तिपत्रक तयार करा.

**उद्देश :** भित्तीपत्रक तयार करण्याचे कौशल्य प्राप्त करतील.

**कृतीचे विवरण :**

- पाठ्यपुस्तकातील कविता संकलित करून त्यांचे लेखन कार्डशीटवर करून घ्यावे .

- नमुन्यादाखल एक कविता दिलेली आहे .अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या कविता गोळा करून विद्यार्थ्यांचे गट करून विद्यार्थ्यांकडून भितीपत्रक तयार करून घ्यावे.

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कार्डशीट व इतर लेखन सामग्री उपलब्ध करून द्यावी आणि आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे .

**शैक्षणिक साहित्य :** कार्डशीट व इतर लेखन सामग्री

**संबंधित पाठ क्र** : 4

**विद्यार्थी कार्यपुस्तिका कृती क्र:** 6 .1

**अध्ययन कृती क्र.6.2**

**अध्ययन कृतीचे नाव :** भित्तीपत्रके वाचा आणि समजून घ्या .

**उद्देश :** विविध संस्थाकडून प्रसिद्ध होणारी भित्तीपत्रके समजून घेतील.

**कृतीचे विवरण :**

- विविध सरकारी कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमाच्या बाबतची भित्तीपत्रके संकलित करून वर्गामध्ये विद्यार्थ्यांना दाखविणे .
  उदा : नेत्रदान महादान , रक्तदान श्रेष्ठदान , नेत्रदान करा – दृष्टी द्या ...................

- शिक्षकांनी एकेक भित्तीपत्रकाविषयी चर्चा करावी , त्याबाबतचे प्रश्न विचारावेत व विद्यार्थ्यांकडून त्याचे महत्त्व लिहून घ्यावे.

**शैक्षणिक साहित्य :** विविध भित्तीचित्रे

**संबंधित पाठ क्र** : 4 , 9

**विद्यार्थी कार्यपुस्तिकेतील कृती क्र** : 6.2

**अध्ययन कृती क्र .6.3**

अध्ययन कृतीचे नाव : चला भित्तीपत्रके तयार करू

उद्देश :भित्तीपत्रकांचे तयार करण्याचे कौशल्य प्राप्त करतील.

कृतीचे विवरण :

- विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना विविध विषय देऊन त्यांच्याकडून भित्तीपत्रके तयार करून घ्यावीत.
- भित्तीपत्रकावर वर्गात चर्चा करावी व भित्तीपत्रके तयार करून दिलेल्या जागेत विद्यार्थ्यांकडून माहिती लिहून घ्यावी.

शैक्षणिक साहित्य : चित्र

संबंधित पाठ क्र : 4,9

विद्यार्थी कार्यपुस्तिका क्र : 6.3

**अध्ययन कृती क्र.6.4**

अध्ययन कृतीचे नाव : वाचन करा व माहिती लिहा.

उद्देश : भित्तीपत्रक पाहून समजून घेतील.

कृतीचे विवरण :

- शाळेमध्ये भिंतीवर वेगवेगळ्या प्रकारची भित्तीपत्रके लावलेली असतात किंवा रेखाटलेली असतात ती भित्तीपत्रके पाहून दिलेल्या जागेत विद्यार्थ्यांनी त्यातील माहिती लिहून काढावी किंवा भितीपत्रके रेखाटावी.
- शिक्षकांनी विविध भित्तीपत्रके तयार करावीत किंवा वेगवेगळ्या स्त्रोतामधून उपलब्ध करावीत .

शैक्षणिक साहित्य : भित्तीपत्रके

संबंधित पाठ क्र : 9 ,16

विध्यार्थी कार्यपुस्तिका क्र: 6.4

**अध्ययन निष्पत्ती क्रमांक : 7.7**

कविता,कथा,नाटक ऐकून घेऊन त्याचा अर्थ समजून घेतात व त्यावरील प्रश्नांची उत्तरे देतात, कवितेचा सारांश लिहितात .

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

- विद्यार्थी कविता, कथा ,नाटक ऐकतात / वाचतात.
- ऐकलेले विषय समजून घेऊन त्याचा अर्थ आपल्या भाषेमध्ये सांगतात व त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात .

**अध्ययन कृती क्रमांक : 7.1**

अध्ययन कृतीचे नाव : कविता वाचा –सारांश लिहा

उद्देश : कविता वाचून त्याचा अर्थ समजून घेऊन सारांश आपल्या शब्दात लिहितात .

कृतीचे विवरण :

- विद्यार्थ्यांचे विविध गट करून त्यांना विविध कविता किंवा काव्यपंक्ती द्याव्यात .
- शिक्षक कवितेचे वाचन करतील किंवा ध्वनिफिती ऐकवतील किंवा व्हिडीओ दाखवतील.
- विद्यार्थी ऐकून अर्थ समजून घेतील .
- कवितेचा सारांश आपल्या शब्दात लिहितील .

शैक्षणिक साहित्य : कवितेच्या पट्ट्या , कवितेच्या ध्वनिफिती /चित्रफिती

संबंधित पाठ क्रमांक : इयत्ता 7 वी मायमराठी पुस्तकातील सर्व कविता

मूल्यमापन कृती क्रमांक : 7.1

**अध्ययन कृती क्रमांक 7.2**

अध्ययन कृतीचे नाव : श्लोक,अभंग, ओव्या ऐकूया .

उद्देश : विद्यार्थी श्लोक,अभंग, ओव्या ऐकून ,वाचन करून त्यातील अर्थ समजून घेतील .

कृतीचे विवरण :

- विविध संतानी रचलेल्या अभंग ,श्लोक , ओव्या यांच्या ध्वनिफिती ऐकविणे किंवा शिक्षकांनी गाऊन दाखविणे.
- विद्यार्थी श्रवण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहितील .

शैक्षणिक साहित्य : ऑडिओ टेप. संतांची चित्रे

संबंधित पाठ क्रमांक : 13

मूल्यमापन कृती क्रमांक 7.2

**अध्ययन कृती क्रमांक : 7.3**

अध्ययन कृतीचे नाव : कथा ऐकू - कथा सांगू .

उद्देश : विविध माध्यमातून कथा ऐकून कथा आपल्या भाषेत सांगतात .

कृतीचे विवरण :

- शिक्षक कथा सांगतील किंवा कथेची ध्वनिफीत ऐकवतील किंवा चित्रफित दाखवतील .
- विद्यार्थी कथा ऐकून आपल्या भाषेत पुन्हा सांगतील / लिहितील.
- कथेवर आधारित प्रश्न विचारून त्यांची उत्तरे घ्यावीत .

शैक्षणिक साहित्य : विविध कथांचा संग्रह , कथेंच्या ध्वनिफिती / चित्रफिती

संबंधित पाठ क्रमांक : 18

मूल्यमापन कृती क्रमांक : 7.3

**अध्ययन कृती 7.4**

अध्ययन कृतीचे नाव : नाटक ऐका –सारांश लिहा

उद्देश :

विद्यार्थी नाटकाची ध्वनिफीत ऐकून / चित्रफित पाहून समजून घेतील व आपल्या भाषेत सांगतील. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतील .

कृतीचे विवरण :

- नाटकाच्या / एकांकिकेच्या ध्वनिफीती / चित्रफिती ऐकवाव्यात .
- ध्वनिफीती / चित्रफिती यांची उपलब्धता नसल्यास शिक्षकांनी स्वतःच्या आवाजात नाटिका / एकांकिका सादर करावी .
- विद्यार्थी ध्वनिफीती / चित्रफिती ऐकून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देतील .

शैक्षणिक साहित्य : नाटकाच्या / एकांकिकेच्या ध्वनिफीती / चित्रफिती

संबंधित पाठ क्रमांक : 24

विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र. : 7.4

**अध्ययन निष्पत्ती क्र 7.8**

प्रासयुक्त ,यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या स्वतः रचना करतात . स्वतः कविता रचतात .

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

1) प्रासयुक्त , यमक जुळणाऱ्या शब्दांचे लेखन करतात .

2) प्रासयुक्त शब्दांची जोडणी करून स्वतः कविता रचतात.

**अध्ययन कृती क्र : 8.1**

कृतीचे नाव : एक शब्द द्या – अनेक शब्द घ्या

उद्देश : दिलेल्या शब्दाला यमक जुळणारे अनेक शब्द लिहितील .

कृतीचे विवरण :

- प्रथम विविध उदाहरणाच्या सहाय्याने यमकयुक्त किंवा प्रासबद्ध शब्द म्हणजे काय हे समजावून द्यावे .
- नंतर फळ्यावर एक शब्द लिहा किंवा शब्दपट्ट्या द्या.
- त्या शब्दाला जुळणारे यमकयुक्त शब्द विविध नमुन्यात गटाद्वारे लिहून घ्यावेत .
- प्रत्येक विद्यार्थ्याला संधी मिळेल याची दक्षता घ्यावी .

आवश्यक साहित्य : व्याकरण पुस्तक ,कार्डशीट, मार्कर , शब्दपट्ट्या

कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध : इयत्ता 7 वी मराठी पुस्तकातील सर्व कविता

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र : 8.1

**अध्ययन कृती क्र : 8.2**

कृतीचे नाव : यमक जुळवा

उद्देश : दिलेल्या शब्दांच्या यादीतील यमकयुक्त शब्दांच्या जोड्या ओळखून लिहितील .

कृतीचे विवरण :

- वर्गातील मुलांच्या संख्येनुसार गट करून मुले गटात बसतील.
- प्रत्येक गटातील प्रत्येक विद्यार्थी शब्दपट्ट्या स्वतः लिहून तयार करेल. ह्या शब्दपट्ट्या तयार करताना प्रासयुक्त शब्दाला दुसरा प्रासयुक्त शब्द असेल अशा रीतीने काळजी घ्यावी .
- नंतर सर्वांच्या शब्दपट्ट्या एकत्र करून एका मुलाने एक शब्दपट्टी उचलून वाचावी आणि त्या शब्दाला जुळणारा प्रासयुक्त शब्द असलेली पट्टी उचलून तोही शब्द वाचावा .अशा रीतीने प्रत्येक विद्यार्थी ही कृती करेल.
- नंतर सर्व प्रासयुक्त शब्दांचे लेखन विद्यार्थ्यांनी आपापल्या वहीत करावे.

आवश्यक साहित्य : व्याकरण पुस्तक ,कार्डशीट, मार्कर , शब्दपट्ट्या

कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध : इयत्ता 7 वी मराठी पुस्तकातील सर्व कविता

विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र : 8.2

**अध्ययन कृती क्र : 8.3**

कृतीचे नाव : कविता वाचा आणि यमक ओळखा

उद्देश :

विद्यार्थी कविता किंवा काव्यपंक्ती दिली असता त्या वाचून त्यातील यमक जुळणारे शब्द ओळखतील .

कृतीचे विवरण :

- कविता किंवा काव्यपंक्ती असलेल्या पट्ट्या तयार कराव्यात .किंवा कविता फळ्यावर लिहावी .
- ह्यासाठी पाठ्यपुस्तकातील कविताही घेवू शकता .
- प्रत्येक गटाला स्वतंत्र कविता किंवा काव्यपंक्ती देण्याचा प्रयत्न करावा .
- मुलांना गटात बसवून त्यांना कवितेचे वाचन / गायन करण्यास सांगणे .
- नंतर त्यातील यमक जुळणारे शब्द शोधून त्यांच्या जोड्या लिहिण्यास सांगणे व वर्गात वाचन घेणे .

आवश्यक साहित्य : कविता /काव्यपंक्ती लिहिलेल्या पट्ट्या , मराठी पाठ्यपुस्तक

कृतीचा पाठ्यपुस्ताकाशी संबंध : इयत्ता 7 वी मराठी पुस्तकातील सर्व कविता

विद्यार्थी कार्य पुस्तकातील कृती क्र : 8.3

**अध्ययन कृती क्र : 8.4**

कृतीचे नाव : शब्द जुळवा – कविता करा

उद्देश : विद्यार्थी दिलेले शब्द वापरून कवितेच्या ओळी पूर्ण करतील .

कृतीचे विवरण :

- शिक्षकांनी फळ्यावर किंवा शब्दपट्ट्यावर काही शब्द लिहावेत.
- नंतर अपरिचित कवितेच्या ओळी अशाप्रकारे लिहाव्यात की प्रत्येक ओळीतील शेवटचा शब्द लिहिलेला नसेल .
- विद्यार्थी दिलेल्या कवितेच्या ओळी वाचून रिकाम्या जागी,दिलेल्या यादीतील योग्य प्रासयुक्त शब्द संदर्भानुसार लिहून अर्थपूर्ण ओळी पूर्ण करतील.

आवश्यक शैक्षणिक साहित्य : कविता लिहिलेल्या पट्ट्या , शब्दांच्या पट्ट्या

कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध : पाठ्यपुस्तकातील सर्व कविता

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र : 8.4

**अध्ययन कृती क्र : 8.5**

कृतीचे नाव : ओळी ओळी जुळवू - कविता बनवू

उद्देश : विद्यार्थी कवितेच्या ओळी कोणत्याही क्रमात दिल्या असता यमक जुळवून योग्य क्रमात जोडतील आणि अर्थपूर्ण कविता तयार करतील .

कृतीचे विवरण :

- कवितेच्या ओळी लिहिलेल्या वाक्यपट्ट्या विद्यार्थ्यांना द्याव्यात किंवा त्या फळ्यावर लिहाव्यात
- विद्यार्थी गटात बसून चर्चा करतील व त्या ओळी लयबद्ध होतील अशा रीतीने जुळवून अर्थपूर्ण काव्यपंक्ती तयार करतील आणि वर्गात वाचून दाखवतील.
- आवश्यक त्या ठिकाणी शिक्षक मार्गदर्शन करतील .

आवश्यक शैक्षणिक साहित्य : कवितेच्या ओळी लिहिलेल्या पट्ट्या

कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध : 7 वी मराठी पाठ्यपुस्तकातील कविता

विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र.: 8.5

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 7.9**

नवीन शब्द समूह, शब्द, वाक्प्रचार, म्हणी, मुद्रित विषय वाचून अर्थ समजून घेऊन त्यांचा स्वत:च्या वाक्यात उपयोग करतात.

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

1) वाक्प्रचाराचा अर्थ समजून घेऊन वाक्यात उपयोग करतात .

2) विविध म्हणींचे संकलन करतात , स्वतः म्हणी तयार करतात . म्हणीचा अर्थ सांगतात .

**अध्ययन कृती क्र.: 9.1**

अध्ययन कृतीचे नाव : " शोधा शोधा वाक्प्रचार"

उद्देश :

आपल्या दैनंदिन जीवनात एकमेकांशी संवाद साधताना वापरात येणारे शब्द ,वाक्प्रचार यांचा अर्थ समजून घेऊन विद्यार्थी त्याचा उपयोग बोलताना स्वतः करतील व त्यांची यादी बनवतील .

कृतीचे विवरण :

- विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार त्यांचे गट करून गटाला शरीराच्या अवयवांचे नाव द्यावे

  उदाहरणार्थ :- हात ,डोके ,पाय ,बोट,पोट इ.

- अवयवांना संबंधित वाक्प्रचारांच्या पट्ट्या जमिनीवर पसराव्यात.
- जमिनीवर पसरलेल्या वाक्प्रचारांच्या पट्ट्यामधून गटाला दिलेल्या अवयवांच्या नावावरून तयार होणारे वाक्प्रचार संबंधित गटाने शोधावेत.

  उदाहरणार्थ:--1) बोट मोडणे

  2) बोट ठेवणे

शैक्षणिक साहित्य : अवयवांची चित्रे, वाक्प्रचारांच्या पट्ट्या ,ग्रंथालयातील व्याकरणावर आधारित पुस्तके

संबंधित पाठ क्र : इयत्ता सातवीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील सर्व पाठ

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 9.1 A , 9.1 B

**अध्ययन कृती क्रमांक: 9.2**

अध्ययन कृतीचे नाव :" अक्षरे जोडा वाक्प्रचार बनवा."

उद्देश: विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात वापरात येणाऱ्या वाक्प्रचारांची ओळख होते.

कृतीचे विवरण :

- विद्यार्थ्यांचे गट तयार करून करून वाक्प्रचार असलेली फ्लॅश कार्डे गटामध्ये द्यावीत.
- विद्यार्थ्यांना अक्षरांच्या कार्डांची योग्य क्रमाने जुळणी करून वाक्प्रचार तयार करण्यास मार्गदर्शन करावे.
- विद्यार्थ्यांनी तयार केलेले वाक्प्रचार सर्व गटाकडून वाचून घेऊन वाचलेल्या वाक्प्रचारांचे लेखन करून घ्यावे.

शैक्षणिक साहित्य : अक्षरांची फ्लॅश कार्डे

संबंधित पाठ क्रमांक : इयत्ता सातवीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील सर्व पाठ

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक: 9.2 A , 9.2 B

**अध्ययन कृती क्रमांक : 9.3**

अध्ययन कृतीचे नाव : "म्हणींचा गोंधळ थांबवा."

उद्देश : विद्यार्थ्यांना दैनंदिन वापरात येणाऱ्या म्हणींची ओळख होते.

कृतीचे विवरण :

- प्रथम म्हणींचा तक्ता दाखवून शिक्षकांनी म्हणींची ओळख करून द्यावी त्यांचा विद्यार्थ्यांकडून संग्रह करून घ्यावा.
- म्हणींच्या शब्दांमध्ये बदल करून विद्यार्थ्यांकडून योग्य म्हण तयार करून घ्यावी

**उदाहरणार्थ** :-. वासराला गुळाची चव काय?

'वासराला' या शब्दाऐवजी येणारा योग्य शब्द विद्यार्थ्यांकडून विचारून घ्यावा व म्हणी मध्ये बदल करावा.

जसा- 'गाढवाला गुळाची चव काय'

शैक्षणिक साहित्य : म्हणींचा तक्ता

संबंधित पाठ क्रमांक : 2,6,9,12,25

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 9.3

**अध्ययन कृती क्रमांक : 9.4**

अध्ययन कृतीचे नाव : "चित्र पहा म्हण ओळखा."

उद्देश : विद्यार्थ्यांना विविध प्रकारची चित्रे पाहून म्हण ओळखता यावी.

कृतीचे विवरण :

- विद्यार्थ्यांना म्हणीवर आधारित विविध चित्रे दाखवून त्यावरुन विद्यार्थ्यांकडून म्हण ओळखून घ्यावी
- म्हणीवर आधारित रिकाम्या जागा भरून घ्याव्यात.

शैक्षणिक साहित्य : म्हणीवर आधारित प्राणी-पक्षी, नदी यांची चित्रे

संबंधित पाठ क्रमांक : 2,6,9,12,25

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 9.4 A ,9.4 B , 9.4 C

**अध्ययन कृती क्रमांक: 9.5**

अध्ययन कृतीचे नाव : "म्हण वाचा अर्थ ओळखा."

उद्देश : विद्यार्थ्यांना म्हणीचा अर्थ सांगता यावा व दिलेल्या विश्लेषणावरुन म्हण ओळखता यावी.

कृतीचे विवरण:

- शिक्षकांनी एकच केंद्र असलेली आत व बाहेर अशी दोन वर्तुळे आखावीत व विद्यार्थ्यांना दोन्ही वर्तुळावर उभे करून घ्यावे .
- बाहेरील वर्तुळात असलेल्या विद्यार्थ्यांकडे म्हणींची कार्डे द्यावीत व आतील वर्तुळात असलेल्या विद्यार्थ्यांकडे त्या संबंधित म्हणींचा अर्थ असलेली कार्डे द्यावीत.
- एका विद्यार्थ्याने म्हण मोठ्याने वाचावी व त्या म्हणीचा अर्थ ज्या विद्यार्थ्यांकडे आहे त्या विद्यार्थ्याकडून अर्थाचे वाचन करून घ्यावे. अशा पद्धतीने वेगवेगळ्या म्हणी व त्यांचा अर्थ वापरून हा खेळ खेळावा.

शैक्षणिक साहित्य : म्हणींची कार्डे व त्यांच्या अर्थांची कार्डे

संबंधित पाठ क्रमांक : 2,6,9,12,25

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक : 9.5 A , 9.5 B

**अध्ययन निष्पत्ती क्र.** 7.10

चित्रावरून कथा/ गोष्ट सांगतात व लिहितात.

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

- विद्यार्थ्यांना चित्र कथांचे वाचन करता येते. चित्रकथा क्रमाने जोडता येतात.
- जोडलेल्या चित्रानुसार गोष्ट सांगतात व लिहितात.
- ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या चित्रकथा स्वतःच्या शब्दात लिहितात व स्वतः गोष्ट रचना करू शकतात.

**अध्ययन कृती क्र.** : 10.1

अध्ययन कृतीचे नाव : "चित्रकथा क्रमाने जोडू - कथा तयार करू".

उद्देश :विद्यार्थ्यांना योग्यरीत्या चित्रांचे क्रम लावून कथा गोष्टी तयार करता येतील.

कृतीचे विवरण:

- विद्यार्थ्यांचे दोन गट करणे, दोन्ही गटांना चित्रकथांचे क्रम बदलून देणे.
- कथेवरील चित्रे पाहून विद्यार्थ्यांना कथेच्या अर्थानुसार योग्य तो क्रम जोडून कथा तयार करण्यास सांगणे.

शैक्षणिक साहित्य :गोष्टीला अनुसरून चित्रे , गोष्टींची पुस्तके

संबंधित पाठ क्र : ----16, 21

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र.: 1

**अध्ययन कृती क्र.** :10.2

अध्ययन कृतीचे नाव : "चित्र कथांचा संग्रह करू".

उद्देश :विद्यार्थ्यांना चित्रकथा वाचनाची आवड निर्माण होईल. चित्रकथा संग्रह करण्यास प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांच्यात छंदाची जोपासना होईल.

कृतीचे विवरण:

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या फावल्या वेळेत वर्तमानपत्रातील किंवा इतर पुस्तकांमधील विचित्र कथांचा संग्रह करायला लावणे. वर्गात कथांचे वाचन घेणे.
- कात्रणे जमा करायला वेळ देऊन जास्तीत जास्त चित्रकथा संग्रह करणाऱ्या विद्यार्थ्यांना टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन करणे.

शैक्षणिक साहित्य :जुनी वर्तमानपत्रे, वाचनालयातील चित्र कथांची पुस्तके

संबंधित पाठ क्र : 16

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र.: 2

**अध्ययन कृती क्र. :10.3**

अध्ययन कृतीचे नाव : "आम्ही संवाद करतो".

उद्देश: विद्यार्थ्यांना चित्रे पाहून  चित्रावरील संवाद स्वतःच्या शब्दात लिहिता येतील. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळेल.

कृतीचे विवरण: शिक्षकांनी विविध चित्रे दाखवावीत. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला लावणे .त्या चित्रातील पात्रांचे संवाद स्वतःच्या शब्दात लिहून कथा तयार करायला लावणे.

शैक्षणिक साहित्य : चित्रांचा तक्ता, क्रमिक पाठ्यपुस्तक

युट्युब वरील लिंक  :    https://youtu.be/alnB4OkE1yM

संबंधित पाठ क्र.: 16

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.3

**अध्ययन कृती क्र. :10.4**

अध्ययन कृतीचे नाव : "आम्ही गोष्ट रचतो"

उद्देश :विद्यार्थ्यांना स्वतःच्या कल्पनाशक्तीचा वापर करून गोष्ट लिहिता येईल..

कृतीचे विवरण:

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे चार गट तयार करणे.
- नंतर एक चित्रकथा दाखविणे विद्यार्थ्यांना योग्य त्या सूचना देऊन गटवार कथा लेखन करून घेणे. ज्या गटाची कथा उत्कृष्ट होईल त्या गटाला गोष्टींचा राजा असे संबोधणे.

शैक्षणिक साहित्य :कथेसाठी चित्रे, वाचनालयातील कथा पुस्तके

युट्युब वरील लिंक : https://youtu.be/HXBN4jyqxmo

संबंधित पाठ क्र : 21

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.4

**अध्ययन कृती क्र. :10.5**

अध्ययन कृतीचे नाव : "चित्रांचा गोंधळ"

उद्देश :विद्यार्थी चित्रांचे वाचन करतील,त्याचबरोबर योग्य ते शब्द वापरून कथालेखन केल्यामुळे लेखन सामर्थ्यामध्ये वाढ होईल.

कृतीचे विवरण:

शिक्षकांनी गोष्ट लिहिलेला लेखन तक्ता विद्यार्थ्यांना दाखवावा. त्यानंतर विद्यार्थ्यांना चित्रांच्या जागी योग्य ते शब्द वापर आणि कथावाचन कर,अशा सूचना देऊन प्रत्येक विद्यार्थ्यांकडून चित्रकथेचे वाचन करून घेणे..

शैक्षणिक साहित्य :गोष्ट लिहिलेला लेखन तक्ता, किंवा चित्र तक्ता.

युट्युब वरील लिंक: https://youtube.com/watch?v=4M-iiRwUbBY&feature=share

संबंधित पाठ क्र.: 16

विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र : 10.5

**अध्ययन निष्पत्ती क्र.** 7.11

कथेचे नाटकात आणि नाटकाचे कथेत रूपातंर करतात.

अध्ययन निष्पतीची व्याप्ती आणि महत्व :

1) कथेचे नाटकात  रुपांतर करतात .

2) नाटकातील संवाद वाचून किंवा ऐकून त्याचे कथेत रुपांतर करतात .

**अध्ययन कृती क्र : 11.1**

**अध्ययन कृतीचे नांव** : " चला करू कथाकथन"

**उद्देश** : नाटकाचे कथेत रुपातंर करण्याचे सामर्थ्य प्राप्त करतील.

**कृतीचे विवरण** :

शिक्षकांनी  वर्गामध्ये विद्यार्थी श्रवणाकरीता योग्य ध्वनी प्रक्षेपक/ मोबाईल उपलब्ध करावेत.

इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातील संवाद / संभाषणवरील आधारित पाठाचे आदर्श वाचन करावे ..नंतर विद्यार्थी ते ऐकून गोष्ट स्वरूपात लिहितील .

**शैक्षणिक साहित्य** :  7 वी मराठी पुस्तक ,

**संबधित पाठ क्र. : तीन प्रश्न**

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र.** 11.1

**अध्ययन कृती क्रमांक 11.2**

**अध्ययन कृतीचे नाव** : अभिनयाचा बादशहा

**उद्देश** : अभिनय करण्याचे सामर्थ्य प्राप्त करतील .तसेच संवाद करताना आवाजातील चढउताराचे ज्ञान प्राप्त करतील .

**कृतीचे विवरण** :

- छोट्या नाटीकेचे  गटवार सादरीकरण करून घेणे.
- अभिनय करताना आवाजातील चढ-उतार  व हावभाव कसा करावा याचे प्रात्यक्षिक करून दाखविणे  .

उदाहरणार्थ – “नदी व झाड” तसेच “झाड व पक्षी” अशा अनेक संवादांचे सादरीकरण करून घेणे

**शैक्षणिक साहित्य** : छोट्या नाटकांची पुस्तके , ग्रंथालयातील पुस्तके  ,ध्वनीफिती व चित्रफिती .

**संबंधित पाठ क्रमांक :** 9 आम्ही टिकलो तर तुम्ही टिकाल **.**

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक** : 11.2

**अध्ययन कृती क्रमांक 11.3**

**अध्ययन कृतीचे नाव** :"आम्ही गोष्ट पूर्ण करतो "

**उद्देश** : चित्रे पाहून कथा लिहितील   .त्यांचे संवादामध्ये रूपांतर करण्याचे सामर्थ्य  प्राप्त करतील .

**अध्ययन कृतीचे विवरण** :

- वर्गामध्ये गोष्टीची चित्रे दाखवून गोष्ट कशी लिहावी  त्याचबरोबर संवाद कसे लिहावे याचे मार्गदर्शन करावे  .
- चित्रावरून कथा  लिहून घ्यावी .

**शैक्षणिक साहित्य** :  चित्रकथा , मासिकातील चित्रे  ,गोष्टींची पुस्तके.

**संबंधित पाठ क्रमांक** : परोपकाराचे फळ , जावयाची करामत ,वीर स्त्री रायबगन

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक** 11.3

**अध्ययन कृती क्रमांक 11.4**

**अध्ययन कृतीचे नाव** : "आम्ही कलाकार"

**उद्देश** : विद्यार्थी अभिनयाचे ज्ञान प्राप्त करुन संवाद करण्याची कला अवगत करतील .

**कृतीचे विवरण** _

शिक्षकांनी वर्गामध्ये हावभावयुक्त संवाद कसा साधावा , आपल्या हावभावातून विषयाचे स्पष्टीकरण कसे करावे याचे अभिनयातून सादरीकरण करून दाखवून मुलांकडून करून घ्यावे .

**शैक्षणिक साहित्य** : वेगवेगळे मुखवटे उदाहरणात प्राणी, पक्षी ,राजा ,राणी इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक** : 16 तीन प्रश्न

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती** 11.4

**अध्ययन कृती क्रमांक 11.5**

**अध्ययन कृतीचे नाव** : संवाद वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा .

**उद्देश** : संवादाचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे देण्याचे सामर्थ्य प्राप्त करतील .

**कृतीचे विवरण** :

- वर्गामध्ये वेगवेगळ्या संवादाचे वाचन करून घ्यावे .त्यावर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांकडून उत्तरे घ्यावीत .

**शैक्षणिक साहित्य** : संवादाच्या ध्वनिफिती ,मासिकातील संवाद ,वर्तमानपत्रातील संवाद .

**संबंधित पाठ क्रमांक :** आम्ही टिकलो तर तुम्ही टिकाल

**विद्यार्थी कार्यपुस्तिका कृती क्र** : 11.5

अध्ययन निष्पत्ती क्रमांक : 7.12

दिलेल्या सूचनांचा अवलंब करून शब्दकोडे सोडवितात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व** :

- स्थानिक पातळीवर ऐकलेली कोडी ,शब्दखेळ, उखाणे सोडवितात.
- प्रथम ,मध्ये अथवा शेवटी, सारखेच असलेले शब्द ओळखू शकतात.
- विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळते .स्मरणशक्ती वाढते. शब्दकोडे तयार करून आपले भाषेचे ज्ञान वाढवतात .नवीन शब्द शिकतात . विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

**अध्ययन कृती क्रमांक : 12.1**

**अध्ययन कृतीचे नाव** : खेळ एका अक्षराचा.

**उद्देश** - विद्यार्थी शब्दभांडार वाढविण्याचे सामर्थ्य प्राप्त करतील.

**कृतीचे विवरण** :

- विद्यार्थ्यांचे लहान गट करून शब्दकोडे योग्य सूचना देऊन सोडवून घेणे. .
- विद्यार्थ्यांचे शब्दभांडार वाढविण्यास सुलभकारानी वेगवेगळी कोडी देऊन उदाहरणे देऊन मदत करावी व त्या आधारे वेगवेगळ्या सराव कृती देऊन त्या सोडविण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.

**शैक्षणिक साहित्य :** शब्दपट्ट्या , वर्तमानपत्रातील कोडी,

**संबंधित पाठ क्रमांक** : 3

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक** : 12.1a 12.b

**अध्ययन कृती क्रमांक 12.2**

**अध्ययन कृतीचे नाव** : ओळखा पाहू

**उद्देश** : स्मरणशक्ती वाढवतील व विचारांना चालना मिळेल.

**कृतीचे विवरण** :

- मागील इयत्तेमध्ये सोडविलेली शब्दकोडी, वर्तमानपत्रातून येणारे शब्द कोडी विद्यार्थ्यांचे गट करून सोडवून घ्यावीत .

- स्थानिक पातळीवर ऐकलेली उखाणे मुलांना सोडून दाखविणे. .त्यांच्या विचारांना चालना द्यावी व वेगवेगळी स्थानिक पातळीवरील उखाणे सोडवून दाखवावीत व विद्यार्थ्यांना सराव कृती तयार करण्यास प्रोत्साहित करावे .

**शैक्षणिक साहित्य** : वर्तमानपत्रे व बाल मासिके,

**संबंधित पाठ क्रमांक :** 19

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्रमांक** : 12.2

**अध्ययन कृती** 12.3

**अध्ययन कृतीचे नांव** - पुढील अक्षर शोधून शब्द पूर्ण कर.

**उद्देश** : विद्यार्थी नवीन शब्दांचे अर्थ समजून घेतील .पर्यायी शब्द शोधण्याकडे त्याचा कल असेल .भाषा ज्ञान मिळविण्याची चुरस वाढीस लागेल.

**कृतीचे विवरण** :

- शब्दसमूहाबद्दल एक शब्द याची माहिती देणे .
- एका शब्दाला असलेला समानार्थी शब्द शोधून रिकाम्या जागा भरण्यास मदत करणे .
- मराठी शब्दसंग्रह याचा वापर करून मुलांच्या पूर्वज्ञानाच्या आधारावर त्याची व्याप्ती वाढविण्यास मदत करणे. गटकार्य करून त्याच्यामध्ये चुरस निर्माण करणे.

**शैक्षणिक साहित्य** : शब्दकोश व्याकरणाची पुस्तके ,समानार्थी शब्दांच्या पट्ट्या

**संबंधित पाठ क्रमांक** : 23

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती** : 12.3

**अध्ययन कृती क्रमांक** 12.4

**अध्ययन कृतीचे नांव** : पहा माझी करामत.

**उद्देश** : भाषेची व्याप्ती समजून घेतील . शब्दांमधील अक्षरांचे महत्त्व समजतील .लयबद्ध शब्द तयार करतील .

**कृतीचे विवरण** :

- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याकडून मनोरंजनात्मकरित्या वेगवेगळे शब्द घेऊन लयबद्ध शब्द तयार करण्यास प्रोत्साहित करणे .

- शेवटचे अक्षर सारखेच असावे असें शब्द तयार करून घेणे .

**उदाहरणार्थ** – कळी, पुरणपोळी ...........इत्यादी असे मनोरंजनात्मक रीतीने कोडी तयार करण्यास मार्गदर्शन करावे .

**शैक्षणिक साहित्य** : मनोरंजनात्मक कोडी.

**संबंधित पाठ क्रमांक** : 21 ,23, 14, 19

**विद्यार्थी कार्यपुस्तिकेतील कृती क्रमांक** : 12.4 a ,12.4 b

**अध्ययन कृती 12.5**

**अध्ययन कृतीचे नाव** : चला विचार करू व लिहू.

**उद्देश** : सूचनांचे पालन करून कोडे सोडविण्याचे सामर्थ्य प्राप्त करतील .

**कृतीचे विवरण** :

- विद्यार्थ्यांना शब्दकोडे सोडविण्यासाठी योग्य सूचना देऊन मार्गदर्शन करावे .
- आडवे तसेच उभे शब्द यांची जुळवणी करून अर्थपूर्ण शब्द तयार करण्यास मदत करणे
- वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून विद्यार्थ्यांच्या मनात भाषेबद्दल आवड निर्माण करावी.

**शैक्षणिक साहित्य** : वर्तमानपत्रे,मासिके,पाठ्यपुस्तके

**संबंधित पाठ क्रमांक** : 3 , 7

**विद्यार्थी कार्यपुस्तिकेतील कृती क्रमांक** : 12.5

**अध्ययन निष्पत्ती क्र. : 7.13**

दिलेल्या विषयावर निबंध, पत्रे, प्रवास वर्णने स्वतःच्या शब्दात लिहितात.

अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व :

- विद्यार्थी स्वतःच्या शब्दात निबंध लेखन करू शकतात.
- पत्रांचे विविध नमुने, विविध प्रकार यांची माहिती करून घेतात.औपचारिक आणि अनौपचारिक पत्र स्वतः लिहायचा अनुभव घेतात.
- प्रवासवर्णन आपल्या लेखणीतून प्रकट करतात.

**अध्ययन कृती क्र.**13.1

**अध्ययन कृतीचे नाव :** " मुद्द्यानुसार निबंध लेखन".

उद्देश : विद्यार्थी योग्य मुद्द्यांचा वापर करत स्वतः निबंध लेखन करतात.

**कृतीचे विवरण :**

- विद्यार्थ्यांना विविध विषय देऊन त्यावर त्यांच्या शब्दात दहा ते पंधरा ओळी निबंध लिहायला लावणे. उदा. खालील मुद्द्यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांकडून दूरदर्शन या विषयावर निबंध लिहून घेणे.

उदाहरणार्थ – "दूरदर्शन"या विषयावर पुढील मुद्दे देऊन विद्यार्थ्यांना समजावून देणे.

*परिकल्पना - शोधाचा ध्यास आवश्यकता, कृष्णधवल ,रंगीत, केबल ,रिमोट इत्यादी

*विषय विश्लेषण -टीव्हीचा उपयोग, कार्यक्रमाची निवड कशी करावी,कसा पहावा, कोठे ठेवावा, काळजी कशी घ्यावी.

*समारोप -टीव्ही पाहताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात, दुरुपयोग कसा टाळावा,इत्यादी बाबत विवेचन करणे.

अशाच प्रकारे विविध प्रश्न, मुद्दे देऊन वेगळ्या विषयावर शिक्षकांनी निबंध लिहून घेणे.

शैक्षणिक साहित्य : संदर्भग्रंथ, वाचनालयातील निबंधा वरील विविध पुस्तके.

युट्युब वरील लिंक https://youtube.com/watch?v=AxBas1XiC4Y&feature=share

**संबधित पाठ क्र.** 2,3,22 ,24

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र.** 1

**अध्ययन कृती क्र.**13.2

**अध्ययन कृतीचे नाव : चला पत्र लिहू**

**उद्देश :** विद्यार्थी पत्रलेखन हा प्रकार,त्याच बरोबर पत्राचे विविध नमुने, तसेच


औपचारिक आणि अनौपचारिक पत्र लेखनाचे नमुने यांची माहिती प्राप्त करतील.

**कृतीचे विवरण :**

- विद्यार्थ्यांना पत्रांचे वेगवेगळे नमुने दाखविणे. पत्रातील उल्लेख वाचून घेणे.

- प्रत्येक विद्यार्थ्याला पत्र लेखनाचे नियम,पत्राची सुरुवात, मुख्य मायना, पत्रातील शेवटचा उल्लेख, पत्ता इत्यादी माहिती देणे. याप्रमाणे पत्रलेखनाचा सराव करून घेणे.
- पोस्टात मिळणाऱ्या आंतरदेशीय पत्र, पोस्टकार्ड, यांची ओळख करून देणे.
- औपचारिक पत्राचे नमुने दाखवून प्रत्यक्षात पत्र लिहून घेणे. काही पत्रे नियमानुसार लिहावी लागतात याची कल्पना विद्यार्थ्यांना करून देणे.
  उदाहरणार्थ : कार्यालयीन पत्रे, सरकार दरबारी पाठवायची पत्रे.

**शैक्षणिक साहित्य :** पत्रांचे विविध नमुने, पोस्टात मिळणारे स्टॅम्प,पोस्ट पाकीट, लखोटे, विविध पत्रे यांचे नमुने.





युटूब लिंक https://youtu.be/SuSJM-NYl3g

**संबंधित पाठ क्र.** 18

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र**. 13.2

**अध्ययन कृती क्र.**13.3

**अध्ययन कृतीचे नाव** : "अनौपचारिक पत्र लेखन"

**उद्देश** : विद्यार्थी स्वतःच्या हाताने पत्र लिहिण्याचा आनंद काय असतो हे जाणून घेतील.

**कृतीचे विवरण** :

- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोस्टकार्ड आणावयास सांगून, एकमेकांच्या घरी पत्रे पाठविण्यात सांगणे.
- पोस्टकार्डावर पत्र लेखन पद्धतीच्या प्रत्येक घटकाप्रमाणे पत्र लिहून घेणे,
- पत्रामध्ये वापरले जाणारे संक्षेप आणि त्यांचे अर्थ याची माहिती विद्यार्थ्यांना शिक्षकांनी करून देणे.प्रत्यक्ष पोस्टमनच्या हातून पत्र घेताना एक वेगळीच गंमत व आनंद मिळतो हे विद्यार्थ्यांना समजावून देणे.

**शैक्षणिक साहित्य** : पोस्टकार्ड

**संबंधित पाठ क्र** : 18

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र:** 13 .3

**अध्ययन कृती क्र**.13.4

**अध्ययन कृतीचे नाव** :"मुद्यानुसार प्रवास वर्णन करणे."

**उद्देश** : विद्यार्थ्यांना प्रवास वर्णन हा साहित्य प्रकार समजून घेतील.

**कृतीचे विवरण** : सर्वप्रथम प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही मुद्दे देऊन स्वत:च्या शब्दात प्रवास वर्णन करण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य** : पाठ्यपुस्तका मधील प्रवासवर्णने.

युट्युब लिंक https://youtu.be/gLqoYDWGYuY

**संबंधित पाठ क्र** : 18

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र**: 13 .4

**अध्ययन कृती क्र**.13.5

**अध्ययन कृतीचे नाव** :"चला सहलीला जाऊ".

**उद्देश** : विद्यार्थी स्वत: पाहिलेल्या ठिकाणाचे किंवा प्रेक्षणीय स्थळांचे स्वत:च्या शब्दात वर्णन करतात.

**कृतीचे विवरण** :

- शिक्षकांनी शैक्षणिक सहलींचे आयोजन करणे.
- सहलीमध्ये विद्यार्थ्यांना पाहिलेल्या ठिकाणांच्या नोंदी ठेवायला सांगणे.
- विद्यार्थ्यांना सहलीहून परतल्यानंतर ,त्यांनी पाहिलेल्या स्थळांची माहिती, प्रवास वर्णन त्यांच्या शब्दात लिहायला लावणे. सर्वात उत्कृष्ट प्रवास वर्णन केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणे.

**शैक्षणिक साहित्य** : शैक्षणिक सहलींचे आयोजन, सहलीचे वर्णन असणारी पुस्तके .

युट्युब वरील लिंक https://youtu.be/WuMClj9czjg

**संबंधित पाठ क्र**: 18

**विद्यार्थी कार्य पुस्तिकेतील कृती क्र** :13.5

**अध्ययन निष्पत्ती** : 7.14

अपरिचित प्रसंग, घटना, उतारे, आणि संभाषण ऐकून/वाचून अर्थ समजून घेऊन प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्याचे स्वतःच्या शब्दात वर्णन करतात . त्यावरील प्रश्नांची उत्तरे देतात

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्त्व** :

१) अपरिचित उतारे दिले असता ते वाचून किंवा ऐकून त्याचा अर्थ समजून घेऊन त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.

२) संवाद किंवा संभाषण दिले असता ते ऐकून किंवा वाचून त्यातील मुख्य विषय कोणता हे ओळखतात.

३) विविध प्रसंग घटना इत्यादीवर आधारित चित्रे दिली असता त्यांचे वाचन करून आपल्या शब्दांत वर्णन करतात.

४) अपरिचित प्रसंग, घटना किंवा विषय दिले असता त्यावर आपले मत लेखी रूपात व्यक्त करतात .

**अध्ययन कृती क्रमांक** 14 .1

**कृतीचे नाव** : उतारा वाचा - प्रश्नांची उत्तरे लिहा .

**उद्देश** : एखाद्या अपरिचित उतारा दिला असता विद्यार्थी त्याचे श्रवण किंवा वाचन करून समजून घेऊन त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहितील .

**कृतीचे विवरण** :

- शिक्षकांनी अपरिचित उताऱ्याची निवड करावी व फळ्यावर लिहावे किंवा अपरिचित उतारे असलेल्या पट्ट्या तयार कराव्यात .
- उताऱ्यावर आधारित आकलनात्मक प्रश्न तयार करावेत आणि फळ्यावर लिहावेत किंवा प्रश्नपट्ट्या तयार कराव्यात .
- विद्यार्थ्यांना उताऱ्याचे वाचन करण्यास सांगून, प्रश्नांची उत्तरे शोधून लिहिण्यास प्रोत्साहन द्यावे . आवश्यक त्या ठिकाणी शिक्षकांनी मार्गदर्शन करावे.

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : अपरिचित उतारे आणि त्यावरील प्रश्न यांच्या पट्ट्या

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध : "अभ्यास एक छंद" , "डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद"** या पाठांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेऊन त्यावरील प्रश्नाची उत्तरे शोधून लिहिण्यास सांगणे.

**विद्यार्थी कार्यपुस्तिकेतील कृती क्रमांक : 14 .1**

**अध्ययन कृती क्रमांक** : 14.2

**कृतीचे नाव** : "संवाद वाचा - सारांश लिहा"

**उद्देश** :

विद्यार्थी विविध संभाषण किंवा संवाद दिले असता ते ऐकून किंवा वाचून त्यातील आशय ओळखतील त्यावर आपली प्रतिक्रिया सारांश रुपात व्यक्त करतील.

**कृतीचे विवरण** :

- वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या व्यक्तीमध्ये होणारे संवाद - संभाषण असलेल्या पट्ट्या देऊन किंवा फळ्यावर लिहून किंवा संवाद आणि संभाषणाच्या ध्वनिफिती ऐकवून किंवा चित्रफिती दाखवून त्यातील मुख्य विषय किंवा आशय ओळखण्यास सांगून त्यावर विद्यार्थ्यांची लेखी /तोंडी रुपात प्रतिक्रिया घेणे.

उदाहरणार्थ : "दुकानदार आणि ग्राहक" "बस कंडक्टर आणि प्रवासी" "भाजीपाला विक्रेता आणि गिऱ्हाईक" अशा विविध स्वरूपाचे संभाषण देऊन ते वाचण्यास सांगून त्यांच्या संवादाचा सारांश लिहून घ्यावा .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** : विविध प्रसंगांत केले गेलेले संवाद आणि त्यांच्या पट्ट्या, संवादाच्या ध्वनिफिती किंवा चित्रफिती , मोबाइल / स्मार्ट टीव्ही /प्रोजेक्टर

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध : "आम्ही टिकलो तर तुम्ही टिकाल !"** या पाठाचे वाचन करून घेऊन 8-10 ओळीत सारांश लिहून घेणे . प्रश्नांची उत्तरे लिहून घेणे.

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र. 14 .2**

**अध्ययन कृती क्र : 14 .3**

**कृतीचे नाव** : " चित्र पहा आणि वर्णन करा"

**उद्देश** :

विद्यार्थी त्यांना दिलेली चित्रे पाहून त्याचे निरीक्षण करून त्या चित्रावर आधारित माहिती आपल्या शब्दांत लिहितील.

**कृतीचे विवरण** :

- बाजार , जत्रा ..... अशा वेगवेगळ्या प्रसंगांतील चित्रे विद्यार्थ्यांना देऊन त्या चित्रांचे वर्णन विद्यार्थ्यांच्याकडून करून घेणे .
- आवश्यक त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारुन त्यांच्याकडून उत्तराच्या रूपातून माहिती लिहून घेणे .

**आवश्यक शैक्षणिक साहित्य :** विविध प्रसंगांवर आधारित चित्रे,

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** : ..............................

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र :** 14 .3

**अध्ययन कृती क्रमांक** 14.4

**कृतीचे नाव** : **कल्पना विस्तार करा.**

**उद्देश** :

एखादा अपरिचित विषय किंवा प्रसंग दिला असता विद्यार्थी त्यावर आधारे आपले मत, विचार लेखी स्वरूपात व्यक्त करतील .

**कृतीचे विवरण** :

- प्रथम शिक्षकांनी एखाद्या विषयावर लेखन करतांना त्याची सुरुवात, मुख्य विषयाची मांडणी आणि समारोप कसा करावा याविषयी उदाहरणासह माहिती देणे.
- विद्यार्थ्यांना गटात बसवून त्यांना विषय देऊन त्याविषयी चर्चा करण्यास सांगणे.

- विषयाशी संबंधित प्रश्न विचारून त्याची उत्तरे विद्यार्थ्यांकडून घेत लेखन करून घेणे.
- विषयाशी संबंधित प्रश्न तयार करणे किंवा मुख्य मुद्दे देणे.
- प्रत्येक विद्यार्थी स्वतंत्रपणे आपले मत मांडेल यासाठी संधी देणे.

**उदाहरणार्थ** - 'मी पक्षी झालो तर .......' , 'मी सैनिक झालो तर .........'

**आवश्यक शैक्षणिक साधने** : लेखनाचे विषय आणि त्याविषयीचे प्रश्न किंवा मुख्य मुद्दे , निबंध लेखनाचे पुस्तक

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी संबंध** :

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्रमांक** : 14.4

**अध्ययन कृती क्रमांक** 14.5

**कृतीचे नाव** - **चित्रे पहा – संवाद लिहा**

**उद्देश** -

विविध अपरिचित प्रसंग, घटना यावर आधारित चित्रे दिली असता विद्यार्थी आपल्या कल्पनेप्रमाणे संवाद लेखन करतील .

**कृतीचे विवरण** -

- विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय, प्रसंग किंवा घटनेवर आधारित चित्रे द्यावीत .
- मुलांना गटात बसवून चित्राचे निरीक्षण करून त्यात दाखविलेला प्रसंग , त्यातील पात्रे , प्रसंग किंवा घटना घडलेले स्थळ इत्यादीबाबत चर्चा करण्यास प्रोत्साहन देणे.
- नंतर त्यातील पात्रे घेऊन आपल्या कल्पनेने संवादलेखन विद्यार्थ्यांकडून करून घेणे .

- आवश्यक त्या ठिकाणी  मुलांना शिक्षकानी मार्गदर्शन करणे.

“डॉक्टर  आणि पेशंट यामधील संभाषणाचे चित्र”

**आवश्यक शैक्षणिक साहित्य** :  विविध प्रसंगावर आधारित चित्रे

**कृतीचा पाठ्यपुस्तकाशी  असलेला संबंध** : तीन प्रश्न

**विद्यार्थी कार्यपुस्तकातील कृती क्र** : 14.5

# संदर्भ ग्रंथ

| अ. न. | ग्रंथ | प्रकाशक |
|---|---|---|
| 1 | माय मराठी पाठ्य पुस्तके , अध्ययन मानके | डी एस ई आर टी बेंगळूरू |
| 2 | अध्ययन निष्पत्ती | KSQAAC |
| 3 | दीक्षा पोर्टल | भारत सरकार ,कर्नाटक सरकार |
| 4 | निपुण भारत ,FLN | भारत सरकार |
| 5 | कृती संचिका | DIET बेळगावी |
| 6 | यु –ट्यूब वरील शैक्षणिक लिंक | यु ट्यूब |